# प्रकरण तीन

## सामान्य प्रशासन विभाग

**3.1 पर्यावरण संतुलित ग्रामयोजना- स्मार्ट ग्राम या योजनेतंर्गत शासनाकडून प्राप्त निधीतून ग्रामपंचायतीना दयावयाच्या रकमांबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 50,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्मार्ट ग्राम योजना संदर्भात जिल्हास्तरावर सदर योजनेची व्यापक प्रसिध्दी दिलेली कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

2) पंचायत समितीनी मुल्यांकन केलेल्या प्रस्तावांची यादी त्यांच्या गुणांकनास कार्यालयातील सूचना फलकावर लावण्याबाबतची सूचनापत्रे नस्तीत दिसून आली नाहीत. 25 टक्के ग्रामपंचायतीची यादी तपासणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नेमून दिलेल्या तालुका तपासणी समितीकडे योजनेच्या वेळापत्रकानुसार 15 डिसेंबरपूर्वी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नसून याबाबत आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक 16/12/2016 रोजी माहिती विचारणा केली असता विभागाने सदर माहिती विलंबाने म्हणजेच दिनांक 13/01/2017 रोजी दिलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, शासन निर्णयातील परिशिष्ट-ब प्रमाणे नियोजन केलेले नाही.

3) तालुका समितीने दिनांक 31 डिसेंबर पूर्वी ग्रामपंचायतीची तपासणी करुन गुणांकन केलेली यादी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणे आवश्यक असताना दिनांक 25/01/2017 नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी समितीची नियुक्ती केल्याचे दिसून येत आहे.

4) शासन निर्णय दिनांक 21/11/2016 अन्वये नमूद वेळापत्रकानुसार दिनांक 31/12/2016 पूर्वी तालुका तपासणी अहवाल समितीने देणे आवश्यक असताना त्यांनी विलंबाने अहवाल दिल्याने शासन निर्णय दिनांक 21/11/2016 व दिनांक 25/01/2017 मध्ये नमूद दिनांक 26/01/2017 रोजी तालुका स्मार्ट ग्राम निवड करुन पारितोषिक वितरण करणे आवश्यक असतांना विलबांने कार्यवाही केल्याने दिनांक 26/01/2017 रोजी पुरस्कार देता आला नाही. शासन निणर्यातील वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही न झाल्याने याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही का प्रस्तावित केली नाही? याबाबत खुलासा करावा.

5) शासन निर्णय क्रमांक स्मागायो-2016/प्र.क्र.185/योजना-1, दिनांक 30 मार्च, 2017 अन्वये योजनेत निवड झालेल्या गावांना पारितोषिकाची रोख रक्कम देण्याकरीता निधी वितरीत केलेला आहे. तरी दिनांक 01/05/2017 रोजी केलेल्या कार्यक्रमात फक्त प्रमाणपत्र दिल्याचे नस्तीत दिसत आहे. प्रत्यक्षात निधी ग्रामपंचायतीस केव्हा दिला, हे बोध होत नसल्याचे तो कोणत्या दिनांकास दिला, याचा खुलासा करावा. तसेच तो त्याच दिवशी का देण्यात आला नाही, याचा खुलासा करावा.

6) शासन निर्णय दिनांक 21/11/2016 अन्वये जिल्हास्तरावरही स्मार्ट ग्राम म्हणून एका ग्रामपंचायतीची निवड करुन त्यांना रुपये 40,00,000/- इतका निधी दयावयाचा आहे. शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तीन महिन्यानंतर पुर्नमुल्यांकन करुन जिल्हास्तराकरीता एक ग्राम निवड करणे आवश्यक असतांना विभागाने तालुका स्तरावर निवड झालेल्या 5 ग्रामपंचायतींपैकी प्रथम क्रमांकावर असणा-या ग्रामपंचायत-कासगाव, मुरबाडची निवड घोषित केल्याचे नस्तीवरुन दिसून येते. शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने इतर ग्रामपंचायतीस या योजनेत जिल्हास्तरावर भाग घेता आला नाही. यामुळे इतर ग्रामपंचायतीस लाभ घेता आला नाही. तरी अशी कार्यवाही आपण कोणत्या प्राधिकारान्वये केली आहे, याचा खुलासा करावा.

**3.2 जिल्हा परिषद कार्यालयासाठी लोखंडी कपाटे खरेदी करताना झालेल्या अनियमितता.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,90,840/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1) उदयोग, उर्जा व कामागार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस2014/प्र क्र82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 01/12/2016 मधील 5.17 परिशिष्ट-20 नुसार सदर बाब ही महाराष्ट्र लघुउदयोग विकास महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक आहे. जर ते पुरवठा करण्यात असमर्थ असतील, तर त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त शासन निर्णयातील 3.2.3 नुसार खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक आहे. मात्र विभागाने संबधीत महामंडळास दिनांक 15/03/2017 रोजी पत्र देऊन व ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय दिनांक 18/03/2017 रोजी निविदा नोटीस प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्याचे प्रयोजन काय?

2) पुरवठा आदेशात नमूद प्रमाणे पुरवठादार मे. सोनाली एंटरप्रायझेस यांना दिनांक 30/03/2017 पूर्वी पुरवठा करावा, असे नमूद असून चलन क्रमांक 353/16-17, दिनांक 30/03/2017 पूर्वी पुरवठा केल्याचे दिसून येते. तरी कोणत्या वाहनाने एकाच दिवशी जिल्हा परीषद विभाग व पंचायत समिती शहापूर यांना पुरवठा केला? डिलीव्हरी चलनाच्या मागे वस्तू सुस्थितीत प्राप्त झाल्याचा दाखला आढळून आला नाही. तसेच संबधीतांनी तसे विभागास कळविल्याचेही दिसून आले नाही. असे असताना दिनांक 31/3/2017 रोजी पुरवठादाराचे देयक कसे अदा केले, याचा खुलासा सादर करावा.

3) पुरवठादाराचे मुळ देयक लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही. मात्र नस्तीतील दुय्यम देयकाची तपासणी केली असता देयकातून 5 टक्के व्हॅट कपात केलेला नाही. तसेच पुरवठादाराचे व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र ही नस्तीत दिसून येत नाही. तरी रक्कम रुपये 14,550/- ची वसुली करावी व वसुली का केली नाही, याचा खुलासा करावा.

4) लेखापरीक्षणास साठा नोंदवही दर्शविली नसल्याने प्रत्यक्षात किती साहित्य प्राप्त झाले व कोणत्या दिनांकास प्राप्त झाले, याची लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही.

### 3.3 जनसुविधा योजनेंतर्गत मंजूर कामावरील खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2016-2017 ह्या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, पालघरचे जनसुविधा योजना अंतर्गत मंजूर कामांची खर्च नस्तीचे लेखापरीक्षण केले असता ग्रामपंचायत विभागाने जिल्हयातील आठ पंचायत समितींमार्फत जनसुविधा योजनेंतर्गत निधी (सन 2015-2016) एकूण 194 कामे मंजूर करुन एकूण रक्कम रूपये 8,50,23,000/- एवढी रक्कम जिल्हयातील ग्रामपंचायतीना वाटप करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त योजने अंतर्गत सन 2015-2016 ह्या वित्तीय वर्षात एकूण 194 कामे मंजूर करुन त्यासाठी रक्कम रुपये 8,50,23,000/- एवढे निधी ग्रामपंचायतीना वाटप करण्यांत आल आहे. एकूण 194 मंजूर कामापैकी सन 2016-2017 ह्या वित्तीय वर्षा एकूण 142 कामे पूर्ण झाली आहे व 17 कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. तसेच 35 कामे रद्द करण्यात आली आहे. रद्द झालेल्या कामाच्या एकूण रक्कम रुपये 1,51,11,105/- एवढी ग्रामपंचायतीकडून वसूल करुन शासनास भरणा करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही विभागाने केली नाही. त्यामुळे शासनाचा निधी विनाकारण ग्रामपंचायतीच्या खाती शिल्लक आहे. सदरची रक्कम ग्रामपंचायतीकडून वसूल केल्याचा धनादेश क्रमांक दिनांक व रक्कम याबाबतची माहिती लेखापरिक्षणात उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तरी सदर रद्द झालेल्या कामांच्या निधीची अखर्चित रक्कम रूपये 1,51,11,105/- शासन खाती भरणा केल्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

2) उपरोक्त योजने अंतर्गत एकूण 142 कामे पूर्ण झाली आहे. त्यांचे पूर्णत्वाचे दाखले नमूना नंबर 65 व उपयोगिता दाखले लेखापरीक्षणात सादर केले नाहीत.

### 3.4 गौण खनिज अनुदान वाटपाबाबत.

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभागख् जिल्हा परिषदख् पालघर येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात गौण खनिज अनुदान नस्तीची पडताळणी केली असता जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांचेकडील पत्र क्रमांक सामान्य / प्रशासन / ग्रा.पं/ अनुदान/कार्या-6/2016, दिनांक 30/03/2016 नुसार, वित्तीय वर्ष सन 2013-2014 चे वसूल

केलेल्या गौण खनिजावरील स्वामित्व धनाचे मिळकतीतून रक्कम रुपये 1,64,29,802/- अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

सदरचे अनुदान पंचायत समितींनी /तालुक्यांनी तहसीलदार कार्यालयाकडून ग्रामपंचायतनिहाय वितरण याद्या प्राप्त करून उपरोक्त मंजूर अनुदानाचे वाटप करावयाचे आहे. तरी उपरोक्त मंजूर अनुदानाचे वाटप झाल्याबाबतची गट विकास अधिकारी यांचेकडील उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीला आढळून आले नाही. तरी सदर अनुदानाचे वितरण झाले असल्याची उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

2) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांचेकडील पत्र क्रमांक सामान्य/कक्ष-1/टे-1/गौखअ/कावि/-04/ 2017 दिनांक 09/03/2017 नुसार रक्कम रूपये 80,00,000/- व पत्र क्रमांक सामान्य/कक्ष-1/टे-1/गौखअ/कावि/-06/2017 दिनांक 09/03/2017 नुसार रक्कम रूपये 10,00,000/- असे एकूण रक्कम रूपये 90,00,000/- अनुदान प्राप्त झाले असून सदर अनुदान वित्तीय वर्ष सन 2015-2016 चे वसूल केलेल्या गौण खनिजावरील स्वामित्वधनाचे मिळकतीतून मंजूर करण्यात आले आहे. सदर अनुदान लेखा तपासणी दिनांक अखेरपर्यंत ग्रामपंचायातींना वितरीत करण्यात आले नाही. सदर अनुदान तालुकानिहाय ग्रामपंचायतींना वितरण करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

3) 2014-2015 चे वसूल केलेल्या गौण खनिजावरील स्वामित्वधनाचे मिळकतीतून अनुदान प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तसेच सदर अनुदानाची मागणी केली असल्याचे पत्र दप्तरी पहावयास मिळाले नाही. तरी याबाबत खुलासा करावा.

4) सन 2014-2015, 2015-2016 व सन 2016-2017 या वितीय वर्षात किती गौण खनिज अनुदान ग्रामापंचायतनिहाय विभागास प्राप्त होणार आहे, याचा तालुक्यातील तहसील कार्यालयाशी ताळमेळ नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही विभागाने केली असल्याचे आढळून आले नाही.

### 3.5 राज्यातील समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुरक्षा रक्षक व्यवस्था करणे बाबत.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक टीडीसी-2006/3/प्रा.क्र.6/पर्यटन, दिनांक 08/09/2006 अन्वये राज्यातील समुद्र किनाऱ्यावर (बीचेस) पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने रायगड जिल्हा परिषद अंतर्गत एकूण 8 समुद्र किनारे (बीचेस) असल्याने, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2016/प्रा.क्र.-320/पास-3, दिनांक 29/09/2016 अन्वये प्रती समुद्र किनारा सुरक्षेसाठी 2 जीव सुरक्षा रक्षक प्रती सुरक्षा रक्षक रुपये 6,000/- याप्रमाणे व समुद्र किनारा (बीचेस) वर आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी प्रती समुद्र किनारा रुपये 50,000/- या प्रमाणे शासनाकडून रुपये 10,72,000/- इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर अनुदान सप्टेंबर -2016 ते मार्च 2017 या सात महिन्यांचे उपायोजानेसाठी मंजूर केलेले आहे.

याबाबत विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 8 समुद्र किनाऱ्यावर नियुक्त 16 जीवन रक्षक यांचा मासिक उपस्थिती अहवाल लेखापरीक्षणासाठी नस्तीसोबत उपलब्ध करण्यात आला नाही.

2) समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांसाठी आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजनेकरीता 8 समुद्र किनाऱ्यांना (बीचेस) प्रती समुद्र किनारा रुपये 50,000/- याप्रमाणे निधीचे वाटप केलेले आहे. परंतु, पर्यटकांच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक 08/09/2006 मधील नमूद कोणत्या सुरक्षा उपाय योजना केल्या, याचा तपशील तपासणीसाठी उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे निधीचा योग्य वापर झाल्याची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 55(1) नुसार नमुना नंबर 13 मध्ये कार्यालयास प्राप्त होणाऱ्या जमा रक्कमेची नोंद नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम 58(1) नुसार खर्चाची नोंदवही नमुना नंबर 14 मध्ये ठेऊन त्यामध्ये प्रदानाची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे वित्तीय वर्ष 2016-2017 मध्ये विभागाकडून तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वित्तीय वर्षात विभागाला किती अनुदान प्राप्त झाले व किती खर्च झाला, याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

**3.6 अपहार प्रकरणे निपटा-यातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** जिल्हा परीषद अंतर्गत ग्रामपंचायत विभागाने सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात एकुण अपहाराची प्रकरणांची संख्या 147 इतकी आहे. त्यापैकी 22 प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 अखेर अदयाप एकूण प्रकरणे 125 प्रलंबित आहेत असून त्यामध्ये रक्कम रुपये 4,29,85,516/- इतकी गुंतलेली आहे. सदर रक्कमेचे तत्काळ निपटारा करण्याची दक्षता घ्यावी.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक व्हीपीए एम 2013/प्र.क्र.137/पंरा-3, दिनांक 12/06/2013 मधील अनुक्रमांक 1, 3, 4 नुसार अपहारासाठी जबाबदार असणा-या सरपंच व सचिव व ग्रामपंचायत कर्मचारी यांचेवा योग्य ती कार्यवाही केल्याबाबत पडताळणी करता आली नाही. कार्यवाही केलेबाबत सेवा पुस्तकाची नोंद घेतले किंवा कसे, याबाबत खुलासा करावा.

**3.7 ग्रामीण भागात पोल नसलेल्या ठिकाणी पोलसहित स्ट्रीट लाईट बसविणेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामपंचायत विभागाने जिल्हा परिषद योजनेतून ग्रामीण भागात पोल नसलेल्या ठिकाणी पोलसहित स्ट्रीट लाईट बसविणेसाठी रक्कम रुपये 5,05,400/- इतके ग्रामपंचायत खाती वर्ग केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधित ग्रामपंचायतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग यांच्याकडे पोलसहित स्ट्रीट लाईट बसविणेसाठी मागणी अर्ज केल्याचा आवक क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही.

2) ग्रामपंचायतीने अनुदान प्राप्त झाल्याबाबत नमुना नंबर 7 ची सामान्य पावती, उपयोगिता, मुल्यांकन, काम पूर्णत्व दाखला व कार्यान्वीत दाखला घेवून दप्तरी ठेवलेले नाहीत.

3) ग्रामपंचायत ओटवणे यांचे स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्तीबाबत हमीपत्र नाही.

**3.8 14 वित्त आयोग निधीचे अनुदान वाटपातील अनियमितता**.

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सन 2016-2017 मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचेकडील आदेश क्रमांक जिपधु/ग्रापं-1/चौविआ/88/2017 तसेच आदेश क्रमांक जिपधु/ग्रापं-1/चौविआ/2017/289, दिनांक 17/10/2016 अन्वये पहिला हप्ता व दुसरा हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त शासन निर्णयानुसार 90 टक्के निधी ग्रामपंचायतींना वितरीत करणेबाबत आदेश निर्गमित केलेले असतांना ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांनी 100 टक्के अनुदान वितरित केलेले आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे. तसेच शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार 10 टक्के निधी वितरीत करुन खर्च करावयाचे मार्गदर्शक सुचना अद्याप पावेतो अप्राप्त आहेत. त्यामुळे 10 टक्के निधी राखुन ठेवण्याचे आदेश असतांना सदरचा निधी ग्रामपंचायतींना वितरीत करण्याचे प्रयोजन काय?

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक चौविआ-2015/ प्र.क्र.26/वित्त-4, दिनांक 21/12/2015 मधील अनुक्रमांक 4 नुसार निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व आर्थिक व भौतिक अहवाल जिल्हा स्तरावर एकत्रित प्राप्त करुन ग्रामविकास विभागास व महालेखापाल, मुंबई यांना दरमहा सादर करण्यात यावा, असे आदेश निर्ममित करण्यात आलेले आहेत. परंतु, ग्रामपंचायतींकडून गटविकास अधिकारी यांचेमार्फत उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित ग्रामपंचायतीकडून प्राप्त करण्यात येऊन जिल्हा परिषदेस सादर केल्याचे दिसून येत नाही. परंतु, वित्त विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांनी शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ग्रामपंचायत स्तरावर निधी वर्ग करण्यात आलेला असून संबंधित ग्रामपंचातींनी खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त न करता शासनास कोणत्या प्राधिकारान्वये उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले? याबाबत खुलासा करावा.

3) ग्रामपंचायतींचे मासिक खर्चाचे अहवाल माहे मार्च 2017 अखेरचे अवलोकन केले असता 10 टक्के च्या निधीचा खर्च झाल्याचे दिसून येते. ग्रामपंचायतींना 10 टक्के जादा प्रदानाचा निधी संबंधित ग्रामपंचायतीकडून वसुल करण्यात येऊन जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्याचे अनुपालन दर्शवावे.

**3.9 ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणाबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** सामान्य प्रशासन (ग्रामपंचायत विभाग), नंदुरबार यांचेकडील ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर प्रकरणांची नोंदवही तपासणी केली असता सन-2016-2017 या कालावधीतील ग्रामपंचायत स्तरावरील अफरातफर प्रकरणी दिलेल्या माहितीनुसार ग्रामनिधीची एकुण 115 प्रकरणे रक्कम रुपये 3,12,14,832/- आणि जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्राम समृद्धी योजना / संपूर्ण ग्रामीण योजना एकुण 126 प्रकरणे रक्कम रुपये 3,42,68,774.61 प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिसून आले. याबाबत खालील प्रामाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत स्तरावरील अपहारीत रकमेच्या वसुलीबाबत तालुका स्तरावर पंचायत समिती स्तरावरुन वसुलीबाबत ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) सदरचे अपहारित प्रकरणे ब-याच कालावधीपासून प्रलंबित असून वेळीच कार्यवाही न केलेमुळे अपहारीत प्रकरणी बरेचशे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. काही कर्मचारी मयत झालेमुळे सदर प्रकरणी वसुली झाली किंवा कसे, याबाबत स्पष्ट अभिप्राय देता येत नाही. वेळीच कार्यवाही केली गेली नसल्यामुळे सदरची प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिसून येते.

2 अपहारीत प्रकरणी संबंधित कर्मचा-यांविरुध्द प्रशासकीय तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही अघापपावेतो केलेली नाही.

3) अपहारीत संबधित कर्मचारी सेवानिवृत्त होतांना त्यांचेकडे शासनाची अपहारीत तसेच थकबाकी असल्याचे ना-देय प्रमाणपत्र देतांना कोणत्याही प्रकारची चौकशी न करता संबंधितांना ना-देय प्रमाणपत्र देण्यात आले किंवा कसे, याबाबत तशी कार्यवाही दिसून येत नाही.

4) प्रलंबित प्रकरणांचा वर्षनिहाय गोषवारा काढलेला नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद केलेली प्रकरणे कधी व केव्हा पासून प्रलंबित आहेत? ते दिसून येत नाही. याकामी वर्षनिहाय प्रलंबित प्रकरणांचा गोषवारा काढण्यात येवून अनुपालन दर्शवावे.

**3.10 ग्रामपंचायतीतील अफरातफर प्रकरणांबाबत.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) जिल्हा परिषद, जळगाव यांचे कडिल दिनांक 31/3/2017 अखेर अफरातफर प्रकरणे प्रलंबित आहेत त्याअन्वये एकूण 701 प्रकरणामध्ये रक्कम रूपये 56865384.24 प्रलंबित आहेत. याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्र.टी.पी.एम/2687/3020/21 दिनंाक 5/7/1989 अन्वये ग्रामपंचायतीतील अपहाराची प्रकरणे हाताळणसाठी अवलंब करवयाची कार्यपध्दती दिलेली आहे तयाप्रमाणे कार्यवाही करावी.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.पंरास-2005/प्र.क्र.262/पंरास-3 दि.3/9/2005 अन्वये ग्रामपंचायत आर्थिक व्यवहारात मालमत्ता अथवा निधीचा अपहार करण्यास जबाबदार असणारे सरपंच, उपसरपंच,सदस्य सचिव,कर्मचारी किंवा हजर संबधित व्यक्ती यांच्याकडून अपहारीत मालमत्ता/रक्कम बरोबरच त्यांच्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावीत करावी.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.डी.ई एस 2006/प्र.क्र.771/आस्था-12/दि.28/9/2006 अन्वये ग्रामपंचायत अपहार विस्तार अधिकारी कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता गट विकास अधिकारी यांना ही जबाबदार धरण्यात यावे.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 1096/प्र.क्र.115/21-अ दिनांक 27/6/1996 अन्वये विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, उपमुख्य कार्यवारी अधिकारी (ग्राप) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दरमहा पंचायतीचे तपासणी /निरिक्षण करणे आवश्यक आहे.

### 3.11 संगणक व प्रिंटर व अनुषंगिक साहित्य खरेदीतील अनियमितता

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगरचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात आकस्मिक खर्चाचे तपासणीत विभागाने या अहवालास संलग्न परिशिष्टाप्रमाणे संगणक व प्रिंटर, संगणक साहित्य, झेरॉक्स मशिन खरेदी व देखभाल दुरुस्ती यासाठी रूपये 10,15,339/- खर्च केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 82 नुसार एकावेळेस मोठ्या प्रमाणात किंवा प्रत्यक्ष आवश्यकता असेल, तेव्हा वेळोवेळी साहित्याची खरेदी करता येईल.

अ. विभागाने वर्षारंभी त्यांस आवश्यक असलेल्या संगणक व तत्सम साहित्याची एकुण आवश्यकतेची (सामान्य प्रशासन व ग्रामपंचायत विभाग यासह एकत्रित) माहिती काढून वार्षिक दरपत्रके/निविदा चौकशी केलेली नाही.

ब. एकत्रित वार्षिक खर्चाचा अंदाज न काढल्याने, दरपत्रकांची विभागणी झाल्याने वाजवी दर प्राप्त झालेले नाहीत.(उदा. कॅनन प्रिंटर 2900 चे दिनांक 04/04/2016 चे दरपत्रक मागणीत दर रूपये 8,200/- प्राप्त झाले आहेत. तर दिनांक 14/12/2016 चे दर मागणीत दर रूपये 7,800/- प्राप्त झाले आहेत.) दरांतील वाढीमुळे होणाऱ्या हानीचा विभागाने विचार करणे आवश्यक आहे.

क. वेळोवेळी करावयाच्या देखभाल दुरुस्तीसाठी मजूरीचा वार्षिक करार केलेला नाही.

2) विभागाने केलेली साहित्य खरेदी ही विभाजीत स्वरुपाची असल्याने रूपये 1 लक्षवरील खरेदी ई-निविदाव्दारे करण्यात आली नाही. आर्थिक वर्षाचे सुरुवातीस एकुण खरेदीचे नियोजन करून, विहीत मर्यादेनुसार खरेदी प्रक्रिया अवलंबिणे आवश्यक आहे.

3) फाईन कॉम्प्यूटर यांनी दिनांक 1 व 07/04/2016 रोजीचे एक्सर्टनल हार्ड डिस्क 1 टीबी सिगेटच्या दर चौकशीत अनुक्रमे रूपये 5,750/- व 5,800/- दर नमूद केले आहेत. आठ दिवसात वाढलेल्या दरामुळे विभागाने खरेदी केलेल्या 4 नगाचे रूपये 200/- हानी झाली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 81 प्रमाणे प्राप्त साहित्याची विहीत चाचणी केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 90 प्रमाणे नमुना नंबर 32 मधील अचल मत्ता नोंदवहीत प्राप्त साहित्याची परिपूर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. मागील व सन 2016-2017 मधील सर्व खरेदी साहित्याच्या बीलांनुसार नोंदवहीत मशिन क्रमांक, मेक, सिरीयल नंबर इत्यादी तपशिलासह नोंदी घेण्यात आल्या असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

6) आयपॅड/टॅब देण्याबाबत शासन आदेश उपलब्ध करुन दर्शवावेत अन्यथा सदर रक्कम रूपये 98,700/- वसूल करण्यात यावी.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 90(2) प्रमाणे नमुना नंबर 32 मधील अचल मत्ता नोंदवहीत साहित्याची पडताळणी करुन प्रमाणपत्र दिलेले नाहीत.

8) अचल मत्ता नोंदवहीतील सन 1961-1962 पासूनच्या साहित्याच्या नोंदी आहेत. पडताळणीअंती निर्लेखनायोग्य बाबींचे निर्लेखन करणे आवश्यक आहे.

9) अचल मत्ता/अन्य पुरक नोंदवहीत नवीन साहित्य कोणाच्या ताब्यात देण्यात आले, याबाबत स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत.

10) संगणक दुरुस्तीबाबत संगणक चालकाचा नादुरुस्ती अहवाल घेण्यात आलेला नाही. तसेच दुरुस्तीनंतर तत्संबंधीत दुरुस्ती अहवाल घेण्यात आलेला नाही.

11) ॲन्टी व्हायरससारख्या आज्ञावल्या संगणकात लोड केल्याबाबत पुरक नोंदवही न ठेवल्याने, 1 वर्षाचे आत त्या संगणकात दुसऱ्यांदा वाजवी वेळेनंतरच ती आज्ञावली लोड केल्याची खात्री पटली नाही.

12) प्रत्येक संगणक व लॅपटॉप यासाठी अनुक्रमांक देऊन, त्याच्या दुरुस्तीबाबत हिस्ट्रीशिट ठेवणे आवश्यक आहे. तसेच संगणक, लॅपटॉप, प्रिंटर व आयपॅड यासाठी हालचाल नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

13) अनुक्रमांक 35 ते 40, 48 व 49 मधील देयकाचे प्रदानांची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

### 3.12 रिव्हॉलिंग खुर्च्यांच्या खरेदीबाबत

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद उपकर निधीमधून रिव्हॉलिंग खुर्च्यांचे खरेदीवर 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,76,663/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांकस-2014 प्र.क्र.82/भाग-III/उद्योग.4, दिनांक 30/10/2015 च्या 2.9.3 (ब) व 4.1 नुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच 3.2.1 नुसार ई निविदा न करता दरपत्रके मागणी करून खरेदी केली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 83(2) (एक) मधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेली नाही.

2) पुरवठादाराने दरपत्रके सदर करताना मुंबई दुकाने अधिनियम 1948 अन्वये नोंदणी असल्याबाबतचे कागदपत्रे जोडलेले नाही

3) पुरवठा आदेशात जावक क्रमांक व दिनांक तसेच वस्तूचा पुरवठा किती मुदतीत करावयाचा ते नमूद नसून मोघम स्वरूपाचा आहे.

4) एकाच आर्थिक वर्षात एकाच वस्तूची खरेदी विभागणी करून दोन वेगवेगळ्या पुरवठादारांकडून नियमबाह्यपणे केलेली आहे.

5) साहित्याचा चाचणी अहवाल आढळून आला नाही. सबब दर्जेदार साहित्य मिळालेची खात्री झाली नाही.

6) शासन निर्णय दिनांक 30/03/1994 नुसार निविदा/दरपत्रके मागविताना अटी व शर्तीनुसार अत्यावश्यक कागदपत्रे / पात्रतेमध्ये रजिस्ट्रेशन, व्हॅट नोंदणी, आयकर विवरणपत्र, अनुभव याबाबतचे कोणतेही कागदपत्रे न घेता मोठ्या रकमेची नियमबाह्यपणे खरेदी केलेली आहे.

### 3.13 लोखंडी रॅक व्हीलसह केलेल्या खरेदीबाबत

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** जिल्हा परिषद उपकर निधीमधून लोखंडी रॅक व्हीलसह खरेदीवर 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 10,23,187/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दरपत्रकात लोखंडी रॅकची साईझ दिलेली आहे. परंतु, किती गेज एँगल व प्रत्येक रॅकला किती कप्पे असावे, याबाबत स्पेसिफिकेशन नमूद केले नाही. त्यामुळे प्रत्येक नग रॅकची दराची वास्तव तुलना झाली नाही.

2) साहित्याचा चाचणी अहवाल आढळून आला नाही. सबब दर्जेदार साहित्य मिळालेची खात्री झाली नाही.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांकस-2014 प्र.क्र.82/भाग-III/उद्योग.4, दिनांक 30/10/2015 च्या 2.9.3 (ब) व 4.1 नुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच 3.2.1 नुसार ई निविदा न करता दरपत्रके मागणी करून खरेदी केली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 83(2) (एक) मधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेली नाही.

4) एकाच आर्थिक वर्षात एकाच वस्तूची खरेदी विभागणी करून चार वेगवेगळ्या पुरवठादारांकडून नियमबाह्यपणे केलेली आहे.

5) शासन निर्णय दिनांक 30/03/1994 नुसार निविदा / दरपत्रके मागविताना अटी व शर्तीनुसार अत्यावश्यक कागदपत्रे / पात्रतेमध्ये रजिस्ट्रेशन, व्हॅट नोंदणी, आयकर विवरणपत्र, अनुभव याबाबतचे कोणतेही कागदपत्रे न घेता मोठ्या रकमेची नियमबाहयपणे खरेदी केलेली आहे.

6) पुरवठादाराने दरपत्रके सादर करताना मुंबई दुकाने अधिनियम 1948 अन्वये नोंदणी असल्याबाबतचे कागदपत्रे जोडलेले नाही

7) पुरवठा आदेशात जावक क्रमांक व दिनांक तसेच वस्तूचा पुरवठा किती मुदतीत करावयाचा ते नमूद नसून मोघम स्वरूपाचा आहे.

8) महालक्ष्मी फेब्रीकेटर रोलिंग शटर ॲंड वेल्डिंग वर्क्स, अहमदनगर यांच्याकडून आयकर अधिनियम 194 नुसार 2.36 टक्के आयकर व त्यावरील अधिभार रुपये 5,682/- वसूल केली नाही. ती वसूल करून शासन खात्यात जमा करावी. तसेच अनुक्रमांक 1 ते 3 मधील पुरवठादारांकडून 2 टक्केप्रमाणे आयकर कपात केलेला आहे. मात्र त्यावरील 0.36 टक्के अधिभार रक्कम रुपये 2,817/- कपात केलेली नाही. ती वसूल करावी

9) श्रीमान इंजिनीरिंग वर्क्स, अहमदनगर यांचेकडून 22 नग लोखंडी रॅक व्हीलसह खरेदी केली आहे. परंतु, साठा नोंदवही पान क्रमांक 86 वर 20 नग जमा घेतल्याची नोंद आहे. 2 नग कमी जमा घेण्यात आले आहे. याबाबत खुलासा करावा अन्यथा 2 नगांची रक्कम रुपये 21,400/- वसूल करावी.

**3.14 सुधारीत शवदाहीनी पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सुधारीत शवदाहीनी पुरविणेकरिता रक्कम रूपये 79,70,260/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस -2014/प्र.क्र./82/भाग -iii/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 चे नियम पुस्तिकेमधील परिच्छेद क्रमांक 3.2.1 अन्वये खुल्या स्पर्धात्मक निविदेव्दारे परिच्छेद क्रमांक 4.1 ई - निविदा पध्दतीचा वापर करुन सदरची खरेदी केलेली आहे. ई - निविदेचे प्रकाशन ई- निविदा पोर्टल विकसित करुन ई - निविदा पोर्टलवर विभागाचे संकेतस्थळावर करणे अनिवार्य असेल. तथापि, याप्रमाणे ई- निविदा पोर्टल विकसित केलेले नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 4.4.2 नुसार निविदा जाहीरात ही क्रमांक 3 नुसार 25 लाखाचे पुढील निविदा रक्कमेची जाहीरात एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तथापि, जाहीरात ही स्थानिक स्वरुपाचे वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यस्तरीय स्तरावर जाहीर प्रकटण होवून जास्तीतजास्त पुरवठादारांना निविदा भरणेबाबतचा लाभ घेता आला नाही

2) उपरोक्त नियमावलीतील परिच्छेद 4.4.3 नुसार निविदा कालावधी 2 आठवडे किंवा कामाचे किमान 10 दिवस जे जास्त असेल, त्याप्रमाणे दिलेचे ई - निवेदेतील ई - समरी बाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध झाले नाही.

3) साहित्याचे भारतीय मानक ब्युरोकडील विधीग्राहयता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

4) तांत्रिक स्पेसिफिकेशन हे 15-16 नुसार आहे. तथापि COEP / औदयोगिक प्रशिक्षण संस्था यांचे मार्गदर्शन अहवाल उपलब्ध नाहीत. त्यामुळे घेतलेली शवदाहीनी योग्य दर्जाची व मापांची असलेबाबत खात्री होत नाही.

5) उपरोक्तप्रमाणे निविदेस प्रतिसाद न मिळालेने मुदतवाढ शुध्दीपत्रक काढले आहे. परंतु, सदरचे शुध्दीपत्रक प्रसिध्द केलेचे अथवा त्याचे वर्तमानपत्रातुन जाहीर प्रकटण केलेचे दिसुन आले नाही किंवा त्याला मुदतवाढ ऑनलाईन दिल्याचे स्क्रिनशॉट नस्तीसोबत नाही. तसेच उपरोक्त दिनांक 30/10/2015 चे शासन निर्णयातील मुददा क्रमांक 4.4.3.1 नुसार दोन वेळा मुदतवाढ देवूनही जर कमी प्रतिसाद मिळत असेल, तर फेरनिविदा मागवावयाची आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही व अपवादात्क परिस्थितीत खरेदी अधिकारी / समिती ही पुढे जाण्याचा निर्णय घेईल, त्यासाठी सुसहय कारणे नमूद करेल. तथापि, खरेदी समितीची अशी कारणे नस्तीसोबत उपलब्ध नाहीत व किंमतीचे वाजवीपणासाठीची अनुषंगिक कागदपत्रे नाही

6) आधारभूत किंमत अथवा नमूद किंमत जी ठरविण्यात आली आहे ती योग्य असलेबाबतचा बाजारपेठेतील सर्वेक्षण केलेचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

7) याबाबत राज्य शासन / केंद्र शासन / DGS & Dयांचा दरकरार आहे किंवा नाही, याबाबत अहवाल अथवा पडताळणी केलेबाबतचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

8) खरेदी समितीचे दिनांक 14/09/2016 चे निविदा मंजुरीचे इतिवृत्त जोडले आहे त्यावर सर्व समिती सदस्यांच्या सहया नाही. फक्त उपमुख्य कार्यकारी, पंचायत यांचीच सही आहे.

9) तांत्रिक लिफाफयामधील कागदपत्रे तपासता विक्रम स्टोव्हस अँड फॅब्रिकेटर्स यांची कागदपत्रे अतिशय अस्पष्ट आहेत. कागदपत्रे अस्पष्ट असल्याने पडताळणी करता आली नाही. तरी सुस्पष्ट कागदपत्रे उपलब्ध करण्यात यावीत.

10) बीड ओपन डेट ही दिनांक 14/09/2016 असुन प्री - बीड ओपन मीटींग झालेचे इतिवृत्त नाही. तसेच बीड ओपन करताना विक्रम स्टोव्हस अँड फॅब्रिकेटर्स यांनाही आमंत्रित केलेचे पत्र नाही. त्यामुळे हरकती आहेत का? त्याचे निराकारण आदी अहवाल उपलब्ध झाला नाही.

11) मुद्रांक शुल्क हे रूपये 7,500/- चे भरणे आवश्यक असताना रूपये 1,000/- चे लावले आहे. त्यामुळे रूपये 6,500/- कमी कपात शासनास भरणा करण्यात यावे.

12) पुरवठा पश्चात मालाची तांत्रिक तपासणी ही ई - निविदा अटी व शर्तीमध्ये नमुना संचाची यांत्रिक तपासणी प्राचार्य शासनाकडील तंत्र निकेतन अथवा औदयोगिक प्रशिक्षण केंद्र यांचेकडुन करुन घेणेची अट असताना आयटीआय तळेगाव ढमढेरे तालुका शिरुर यांचेकडून दिनांक 29/03/2017 रोजी ग्रामपंचायत, तुळापूर, जातेगाव, खोपोडी यांची केली आहे.

13) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 C नुसार सदर बाब शवदाहीनी ही विशिष्ट स्पेसिफिकेशन देवून करण्यात आलेली असलेने देयकातुन 2 टक्के आयकर रूपये 1,59,405/- कपात करुन आयकर विभागास भरणे आवश्यक आहे.

14) शवदाहीनी नग वाटप केले आहे. सदरचे नग 100 टक्के तालुकयातील ग्रामपंचायतींना बसविले आहेत का शिल्लक आहेत? याबाबत अहवाल उपलब्ध न झालेने पडताळणी करता आली नाही.

ग्रामपंचायतीला साहित्य वाटप केल्यानंतर पुरवठा ठेकेदाराने ग्रामसेवकाची पोहच पावती व साठा नोंदवहीतील पान क्रमांकाची माहिती, काम पूर्ण प्रमाणपत्र जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाला सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण वर्षात नस्ती तपासणीत सदरप्रमाणे माहिती आढळुन आली नाही. निविदा मार्गदर्शक सुचना इत्यादी नुसार पुरवठादाराने पुरवठा आदेशाप्रमाणे साहित्य उपलब्ध असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे व विहीत वेळेत (45 दिवसाचे आत) पुरवठा न केल्यास प्रती आठवडा अर्धा टक्का प्रमाणे व्याज दयावे. तरी चलनांसह काम पूर्ण प्रमाणपत्र ग्रामपंचायत व दोन साक्षीदारांसह सादर करण्यात यावे. विलंबाबाबत दंडाची कार्यवाही करण्यात यावी.

15) उपरोक्त मुददा क्रमांक 1 मधील नियमावलीतील परि. 4.6 नुसार वॉरंटी कालावधी संपेपर्यत अनामत परत करण्यात येवू नये. सदरचा कालावधी 2 वर्षाचा आहे. अनामत रक्कम परत केली किंवा कसे?

16) निविदा स्विकृती प्रपत्र नियमावलीतील परि.क्रमांक 6.4 परिशिष्ट 4 अ , तसेच बँक हमी नमुना परि. 6.10 परिशिष्ट 4.6 प्रमाणे विहीत नमुन्यात नाही.

17) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर / 2239/3101/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/ प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन गावनिहाय लाभ दिलेल्या गावांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि, लाभार्थी मास्टर नोंदवही उपलब्ध झाली नाही. लाभार्थी मास्टर नोंदवही उपलब्ध झाली नाही. तसेच शवदाहीनी इतर शासनाचे निधीतुन अथवा स्वनिधीतुन बसविले नसलेबाबत अभिलेखे उपलब्ध न झालेने पडताळणी करता आली नाही.

18) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1020/प्र.क्र.1418/ दिनांक 09/02/2001 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुनच साहित्य खरेदी अथवा योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. लाभार्थ्यांची मागणी व त्या अनुषंगाने तालुक्यांकडील एकत्रित

मागणी व आवक नोंदवहीला त्याच्या नोंदी त्यातील पात्र व अपात्र लाभार्थी यांची यादी त्यापैकी मंजुर यादी आदी अभिलेखे उपलब्ध नाही. त्यामुळे या सर्व बाबी योग्य असलेची पडताळणी करता आली नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी ए/2008/प्रक्र-446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**3.15 केश कर्तनालय खुर्ची खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 14) -** केश कर्तनालय खुर्ची खरेदीकरीता रक्कम रूपये 59,81,080/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस -2014/प्र.क्र./82/भाग -iii/ उदयोग-4, दिनांक 30/10/2015 चे नियम पुस्तिकेमधील परिच्छेद क्रमांक 3.2.1 अन्वये खुल्या स्पर्धात्मक निविदेव्दारे परिच्छेद क्रमांक 4.1 ई -निविदा पध्दतीचा वापर करुन सदरची खरेदी केलेली आहे. ई - निविदेचे प्रकाशन ई- निविदा पोर्टल विकसित करुन ई - निविदा पोर्टलवर विभागाचे संकेतस्थळावर करणे अनिवार्य असेल. तथापि, याप्रमाणे ई- निविदा पोर्टल विकसित केलेले नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 4.4.2 नुसार निविदा जाहीरात ही क्रमांक 3 नुसार 25 लाखाचे पुढील निविदा रक्कमेची जाहीरात एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात दिली आहे त्यामुळे राज्यस्तरीय स्तरावर जाहीर प्रकटण होवून जास्तीत जास्त पुरवठादारांना निविदा भरणेबाबतचा लाभ घेता आला नाही.

2) उपरोक्त नियमावलीतील परिच्छेद 4.4.3 नुसार निविदा कालावधी 2 आठवडे किंवा कामाचे किमान 10 दिवस जे जास्त असेल, त्याप्रमाणे दिलेचे ई - निवेदेतील ई - समरी बाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध झाले नाहीत.

3) साहित्याचे भारतीय मानक ब्युरोकडील विधीग्राहयता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

4) तांत्रिक स्पेसिफिकेशन हे 15-16 नुसार आहे. तथापि, COEP / औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे मार्गदर्शन अहवाल उपलब्ध नाहीत. त्यामुळे घेतलेली शवदाहीनी योग्य दर्जाची व मापांची असलेबाबत खात्री होत नाही.

5) आधारभूत किंमत अथवा नमूद किंमत जी ठरविण्यात आली आहे ती योग्य असलेबाबतचा बाजारपेठेतील सर्वेक्षण केलेचा अहवाल उपलब्ध झाला नाही. याबाबत राज्य शासन / केंद्र शासन / DGS & D यांचा दरकरार आहे किंवा नाही, याबाबत अहवाल अथवा पडताळणी केलेबाबतचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

6) बीड ओपन डेट ही दिनांक 09/09/2016 असुन प्री-बीड ओपन मीटींग झालेचे इतिवृत्त नाही. तसेच बीड ओपन करताना सर्व निविदाकारांनाही आमंत्रित केलेचे पत्र नाही. त्यामुळे हरकती आहेत का? त्याचे निराकारण आदी अहवाल उपलब्ध झाला नाही. उपरोक्त खरेदीबाबत खरेदी समितीने जी आधारभूत किंमत रूपये 23,000/- ठरविण्यात आली आहे. त्यावर खरेदी समितीतील 5 पैकी 3 सदस्यांच्या सहया आहेत. अध्यक्ष व महाव्यस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र यांच्या सहया नाहीत.

निविदा उघडतानाचे तुलनात्मक तक्ता व इतिवृत्त बैठकीचे अहवालावर खरेदी समितीतील 5 पैकी 1 सदस्यांच्या उपमुख्यकार्यकारी पंचायत यांचीच सही आहे.

7) पुरवठा पश्चात मालाची तांत्रिक तपासणी ही ई - निविदा अटी व शर्तीमध्ये नमुना संचाची यांत्रिक तपासणी प्राचार्य शासनाकडील तंत्र निकेतन अथवा औदयोगिक प्रशिक्षण केंद्र यांचेकडुन करुन घेणेची अट असताना आयटीआय तळेगाव ढमढेरे तालुका शिरूर यांचेकडून दिनांक 31/01/2017 रोजी केली आहे.

8) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 C नुसार सदर बाब शवदाहीनी ही विशिष्ट स्पेसिफिकेशन देवून करण्यात आलेली असलेने देयकातुन 2 टक्के आयकर रूपये 1,19,661/- कपात करुन आयकर विभागास भरणे आवश्यक आहे.

9) 13 तालुक्यांना एकूण 287 केशकर्तनालय खुर्ची वाटप केले आहे. पंचायत समिती निहाय डिलीवरी चलने व सदर नोंदवहीतील नोंदीबाबतचे अहवाल विभागास प्राप्त झाले आहेत. परंतु, पंचायत समितीमार्फत प्रत्यक्ष लाभार्थ्यास साहित्य प्राप्त झालेबाबत पत्रव्यवहार नस्तीला आढळून आले नाहीत. सदरचे साहित्य 100 टक्के

तालुकयातील लाभार्थ्यांना वाटप केले आहेत का शिल्लक आहे? याबाबत अहवाल उपलब्ध न झालेने पडताळणी करता आली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2001/प्र.क्र.408/34, दिनांक 20/04/2001 अन्वये लाभार्थी निकषास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेचे दिसून आले नाही. त्यामुळे गरजू व आर्थिकदृष्टया दुर्बल अशाच लाभार्थींना लाभ मिळालेची पडताळणी करता आली नाही. निवड यादी गतवर्षातील असून प्राप्त प्रस्ताव दिनांकासहीत आवक क्रमांक निहाय तसेच त्यापैकी नामंजुर प्रस्ताव मंजुर प्रस्ताव आदी कागदपत्रे नस्तीसोबत जोडणेत आलेली नाही. योजनेच्या अटी शर्तीनुसार लाभधारकाचे 7/12 उतारे, नमुना नंबर 8 ऊतारे, खाजगी जागा असेल तर भाडेकरार लाभार्थी वयोमर्यादेचा दाखला, नाभिक जात असलेबाबत तलाठी किंवा ग्रामसेवक यांचा लाभार्थी दाखला इत्यादी आवश्यक कागदपत्रे नस्तीला आढळुन आले नाहीत.

11) उपरोक्त नियमावलीतील परि. 4.6 नुसार वॉरंटी कालावधी संपेपर्यत अनामत परत करण्यात येवू नये सदरचा कालावधी 2 वर्षाचा आहे.

12) निविदा स्विकृती प्रपत्र नियमावलीतील परि. क्रमांक 6.4 परिशिष्ट 4 अ, तसेच बँक हमी नमुना परि. 6.10 परिशिष्ट 4.6 प्रमाणे विहीत नमुन्यात नाही.

13) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1020/प्र.क्र.1418, दिनांक 09/02/2001 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुनच साहित्य खरेदी अथवा योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. लाभार्थ्यांची मागणी व त्या अनुषंगाने तालुक्यांकडील एकत्रित मागणी व आवक नोंदवहीला त्याच्या नोंदी त्यातील पात्र व अपात्र लाभार्थी यांची यादी त्यापैकी मंजुर यादी आदी अभिलेखे उपलब्ध नाही. त्यामुळे या सर्व बाबी योग्य असलेची पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी ए/2008/प्रक्र-446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही.

14) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर / 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय / गावनिहाय व कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि, लाभार्थी मास्टर नोंदवही उपलब्ध झाली नाही. लाभार्थी मास्टर नोंदवही उपलब्ध झाली नाही. तसेच सदरचे साहित्य हे इतर शासनाचे निधीतुन अथवा स्वनिधीतुन बसविले नसलेबाबत अभिलेखे उपलब्ध न झालेने पडताळणी करता आली नाही.

4 तालुक्यांमध्ये पूर्वीच्या एकुण 29 लाभार्थ्यांऐवजी नवीन लाभार्थ्यांना लाभ दिले आहेत व याबाबत सदर लाभार्थी हे दुबार असलेचे नमूद आहे तथापि, लाभार्थी मास्टर नोंदवही उपलब्ध झाली नसलेने सदरचे लाभार्थी हे दुबार असलेची पडताळणी करता आली नाही. तसेच पूर्वीच्या लाभार्थ्यांना लाभ नको असलेबाबत संमतीपत्र उपलब्ध नाही. तसेच लाभार्थ्यांची 13 तालुक्यांची एकत्रित मूळ मंजुर यादी व एकत्रित फेर सुधारित सर्वसाधारण सभेने मंजुर केलेली यादी नस्तीसोबत नाही.

### 3.16 मोठया ग्रामपंचायतीना नागरी सुविधासाठी जिल्हा विशेष योजनेतून अनुदानबाबत.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सातारा चे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात मोठया ग्रामपंचायतीना नागरी सुविधासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून विशेष अनुदान नस्तीतील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 32 दिनांक 19/09/2017 अन्वये निर्गमित केले होते. त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

सन 2015-2016 मधील अपुर्ण 85 कामासाठी रुपये 138.03 लाख व सन 2016-2017 मधील नवीन 67 कामासाठी रुपये 361.97 लाख असे एकूण 152 कामाना रुपये 500 लाख इतका निधी ग्रामपंचायतीना वितरीत करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त आदेशातील नियम व अटीनुसार शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/2612/प्रक्र/129/पंरा-4, दिनांक 21/11/2012 प्रमाणे मंजुर कामाच्या मंजुर निधीपैकी 90 टक्के शासन (योजनेतून) व 10 टक्के रककम ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून करणेचे आहे. वरील 152 मंजूर कामावरील शासन निधी व स्वनिधी ग्रामपंचायतीने कशा प्रकारे खर्च केला? याबाबत ग्रामपंचायतीतील प्रमाणक क्रमांक, दिनांक व खर्च रककम याचा आढावा घेवून दाखवावा.

2) मंजुर वरील सर्व 152 कामाचे अटी व शर्तीनुसार अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्रे, काम पुर्णत्वाचे दाखले, पंचायत समिती स्तरावरील अखर्चित अनुदानाचा तपशील, सदर अनुदान ठेव लेख्यात असल्यास त्याबाबतचा तपशील सदर अनुदानातून केलेल्या कामाबाबतचे कार्यारंभ आदेश, सदर कामे सन 2016-2017 या आर्थिक वर्षात न केल्यास पुढील वर्षात करण्यासाठी शासनाची मान्यता असलेला आदेश इत्यादी बाबतचे लेखे, अभिलेखे उपलब्ध नाहीत.

3) एकूण 152 कामावरील शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस/2610/प्रक 129/पंरा-4, दिनांक 16/09/2010 नुसार विनियोजन विकासावरील 1.5 मधील अभ्यास केंद्र या कामावरील कोणत्याही तालुक्यातील खर्च दर्शविलेला नाही. त्यामुळे मोठया गावातील विद्यार्थीना सदर योजनेपासून योजनेच्या लाभापासुन वंचित झालेले आहेत. याबाबत सर्व जिल्हयातील ग्रामपंचायत गावातील आराखडा व पर्यावरण आराखडयामधील सदर विषयावरील कामे न घेता कोणत्या आधारे ग्रामपंचायतीने मंजूर आराखडा तयार केला? याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

4) मंजूर कामे वेगवेगळी आहेत. त्यांची तांत्रिक मान्यता वेगवेगळी घेतलेली नाही. एकत्रित घेतलेली आहे. त्यामुळे बांधकामावरील केलेला कामावरील झालेला खर्चास तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सातारा यांची घेतलेली दाखवावी.

### 3.17 ग्रामपंचायत हद्दीत पवनचक्क्या करांच्या थकबाकीबाबत

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सामान्य प्रशासन विभाग (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सातारा चे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात ग्रामपंचायत हद्दीत पवनचक्क्या कराच्या थकबाकी नस्तीमधील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 30 दिनांक 19/09/2017 अन्वये निर्गमित केले होते. त्यास उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पवनचक्क्या पत्रकावरुन सातारा जिल्हयातील एकूण ग्रामपंचायतीपैकी 118 ग्रामपंचायतीच्या हद्दीत एकूण 1,916 पवनचक्क्या आहेत. सदर पवनचक्क्यांची थकबाकी मोठया प्रमाणात रक्कम रुपये 2,96,40,985/-इतकी अद्याप पंचायतीला येणे आहे. त्यामुळे ग्रामपंचायत उत्पन्नात घट झालेली आहे.

2) एकूण मागणी व झालेला वसुल 62.4 टक्के झालेची माहिती उपलब्ध झाली म्हणजे अद्याप 37.6 टक्के थकबाकी येणे रककम आहे. याबाबत पंचायतीने कोणताही पाठपुरावा केलेला नाही.

3) एकूण 1,916 पवनचक्क्या मधील केलेली आकारणी महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बैठक/2010/प्रक्र218/उर्जा 7, दिनांक 23/10/2011 नुसार प्रत्येक पवन चक्क्याची मोटरीची क्षमता वरील आकारणी केलेबबात माहिती प्रस्तुत करावी व त्याप्रमाणे वसुली झालेचे दाखवावे.

4) पंचायत समिती, पाटण अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीतील पवनचक्क्या वसुलीची टक्केवारी 51 टक्के आहे. ती अत्यंत अल्प आहे. रक्कम रुपये 2,83,20,749/- थकबाकी वसुलीची कार्यवाही करावी.

### 3.18 ग्रामपंचायत अपहार प्रकरण व ग्रामपंचायत ऑडीट शुल्काबाबत

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडील ग्रामपंचायत विभाग, ग्रामपंचायत अपहार प्रकरण व ग्रामपंचायत ऑडीट शुल्काबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली सन 2016-2017 मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियमान्वये नोंदवही अद्ययावत ठेवणे आवश्यक होते. परंतु, ग्रामपंचायत

अपहार प्रकरणाची विहित नमुन्यातील नोंदवही दिसून आली नाही. याबाबत दक्षता घेऊन नोंदवही परिपूर्ण करून अनुपालन दर्शवावे.

2) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणाचे ग्रामपंचायत अपहार प्रकरणाच्या संचिकाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, ग्रामपंचायतीकडील बऱ्याच प्रमाणात अपहार प्रकरणे प्रलंबित असून व त्यामध्ये गुंतलेली रक्कम मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याचे दिसून आले सामान्य प्रशासन विभागाने उपलब्ध केलेल्या माहिती नुसार दिनांक 31/03/2017 अखेर 187 प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम रुपये 3,14,54,684/- आहे.

उपरोक्त तपशिलात दर्शविल्याप्रमाणे अपहारीत रक्कम 3,14,54,684/- च्या वसुलीबाबत कार्यवाही करून अपहार प्रकरणे निकाली काढून रक्कम वसूल करावी.

3) ग्रामपंचायत विभागाकडे मार्च 2017 अखेर एकूण 22,245 इतके ऑडीट शक प्रलंबित असून शिराळा तालूक्यातील एकुण 4,813 प्रलंबित शकांपैकी एकही शक निकाली काढण्यात आला नाही. ही बाब गंभीर असून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

## 3.19 स्थानिक बेकारी अंतर्गत ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी साहित्य पुरविणे अंतर्गत पिठाची चिक्की पुरविणे

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 22,96,000/- खर्च करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचे सन 2016-2017 मधील ग्रामपंचायत विभागाकडील खर्चाचे रजिस्टर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहितेतील नमुना नंबर 14 मधील निवड महिन्यातील खर्च प्रमाणकांची तपासणी केली असता रक्कम रुपये 22,96,000/- इतका खर्च स्थानिक बेकारी अंतर्गत ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी साहित्य पुरविणे अंतर्गत पिठाची चिक्की पुरविणे कामी नोंदविल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही. सदर लाभार्थीची मास्टर नोंदवही शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे ठेवुन अदयावत करुन दाखवावी.

2) लाभार्थ्याने त्यांचे बँक खाते हे आधारला जोडणी केलेबाबतची खात्री करुन सदर रक्कम त्याच खातेवर जमा केलेची खात्री करुन देण्यात यावी.

3) तांत्रिक मंजुरी आदेशामध्ये अटी व शर्ती नमूद नाही. तसेच लाभार्थ्याने खरेदी करावयाचे वस्तूचे स्पेसीफिकेशन नमूद नाही.

4) श्री.अस्लम अब्बास मणेर व श्री मजीद अब्बास मणेर तसेच श्री.आप्पासो विठोबा पांढरे व श्री. बापू विठोबा पांढरे हे एकाच कुटुंबातील नसलेबाबतची कागदोपत्री खात्री करुन देण्यात यावी.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करुन लाभार्थीची आर्थिक उन्नती झाली किंवा कसे, याबाबत फलश्रुती अहवाल दप्तरी नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र,133/का-1417, दिनांक 05/12/2016 अन्वये संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या खात्यावर योजनेंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे आवश्यक असताना लाभार्थ्यांनी सादर केलेल्या खरेदी पावत्या व दिनांकामध्ये फार मोठ्या प्रमाणात तफावत असून सदर पावत्यांची खातरजमा न करता रक्कम अदा केलेचे दिसून येत असून सदर लाभार्थ्यांनी वस्तू खरेदी केलेबाबत संभ्रम निर्माण होत आहे. तसेच त्यांचे वारंटी कार्ड लेखापरीक्षणास सादर करून अनुपालन सादर करावे.

7) पिठाची चिक्कीचा ठरविणेत आलेला प्रती नग दर रूपये 14,000/- कशाच्या आधारे ठरविण्यात आला? हे कागदोपत्री पूर्तता दर्शवावी.

8) श्री.गुलाब गणपती मोहिते, माजर्डे व विठोबा पांडुरंग बाग, मांजर्डे यांची बिलाची दिनांक 24/02/2017 रक्कम रुपये 14,500/- असून बिलावर पावती क्रमांक नमूद नाहीत.

9) गुरुकृपा इंटरप्रायजेस यांचे बिलावर वेगवेगळे पावती क्रमांक नमूद असून सदर क्रमांक हे हस्तलिखित आहेत.

10) उपरोक्त अनुदान हे धनादेश व धनाकर्षाने संबधित लाभार्थ्यांना वाटपासाठी बँकेस आरटीजिएसद्वारे जमा करण्यात आलेल्या लाभाथ्यांचे बँक खाते क्रमांक हे स्थळ प्रतीशी पडताळणी करून हे संबधित लाभार्थ्याच्या नावेजमा झालेची पडताळणी करून खात्री केलेबाबत बँक स्क्रोलवर प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.20 ग्रामीण भागातील केस कर्तनालयासाठी 75 टक्के अनुदानावर अध्ययावत खुर्ची पुरवठा करणे**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सामान्य प्रशासन, विभाग जिल्हा परिषद, सांगली यांचे सन 2016-2017 मधील ग्रामपंचायत विभागाकडील खर्चाचे रजिस्टर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहितेतील नमुना नंबर 14 मधील निवड महिन्यातील खर्च प्रमाणकांची तपासणी केली असता रक्कम रुपये 34,27,520/- इतका खर्च ग्रामीण भागातील केस कर्तनालयासाठी 75 टक्के अनुदानावर अद्यावत खुर्ची पुरवठा करणे कामी नोंदविल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस /कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही. सदर लाभार्थीची मास्टर नोंदवही शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे ठेवुन अदयावत करुन दाखवावी.

2) श्री.सागर बाबुराव ताटे व सागर सुबराव ताटे यांचे निवड यादीत व वाटप यादीत नाव वेगवेगळे असलेचे दिसून येते. तरी दोन्ही व्यक्ती एकच असलेची कागदोपत्री खात्री करुन घ्यावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करुन लाभार्थीची आर्थिक उन्नती झाली किंवा कसे, याबाबत फलश्रुती अहवाल दप्तरी नाहीत.

4) तांत्रिक मान्यता व लाभार्थी निवडीचा ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

5) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र,133/का-1417, दिनांक 05/12/2016 अन्वये संबंधित यंत्रणेने लभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या खात्यावर योजनेंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे आवश्यक असताना लाभार्थ्यांनी सादर केलेल्या खरेदी पावत्यां व दिनांकामध्ये फार मोठ्या प्रमाणात तफावत असून सदर खातरजमा न करताच रक्कम अदा केलेचे दिसून येत असून सदर लाभार्थ्यांनी वस्तू खरेदी केलेबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

6) अद्यावत खुर्चीचा ठरविणेत आलेला प्रती नग दर रूपये 10,000/- कशाच्या आधारे ठरविण्यात आला? हे कागदोपत्री पूर्तता दर्शवावी.

7) सचिन एजन्सीस, सांगली व पोपुलर स्टोअर्स, कराड यांचे बिलावरील पावती क्रमांक हे हस्तलिखित घातले आहेत.

8) उपरोक्त अनुदान हे धनादेश व धनाकर्षाने संबधित लाभार्थ्यांना वाटपासाठी बँकेस आरटीजिएसद्वारे जमा करण्यात आलेल्या लाभाथ्यांचे बँक खाते क्रमांक हे स्थळ प्रतीशी पडताळणी करून हे संबधित लाभार्थ्याच्या नावेजमा झालेची पडताळणी करून खात्री केलेबाबत बँक स्क्रोलवर प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

9) लाभार्थ्याने त्यांचे बँक खाते हे आधारला जोडणी केलेबाबतची खात्री करुन सदर रक्कम त्याच खातेवर जमा केलेची खात्री करुन देणेत यावी.

**3.21 जिल्हा वार्षिक योजनेतून पुर्ण झालेल्या स्मशानशेडला शवदाहिनी पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा वार्षिक योजनेतून पुर्ण झालेल्या स्मशानशेडला शवदाहिनी पुरविणे करिता रक्कम रूपये 49,45,600/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक तंकोजिप/ग्राप/वशि-3/सुशपुरवठा/4542 ते 4644, दिनांक 15/12/2016 मध्ये नमुद केल्याप्रमाणे शवदाहिनी पुरवठा आदेश दिनांकापासून 90 दिवसांत शवदाहिन्यांचा पुरवठा करणेचा आहे. पुरवठा मुदतीत न झालेस एकुण किंमतीच्या 0.5 टक्केस प्रती आठवडा याप्रमाणे विलंब शुल्क आकारणेत येईल. तथापि, पुरवठा दिनांक 11/04/2017 पर्यंत करण्यांत आलेला आहे. त्यामुळे दिनांक 15/03/2017 ते दिनांक 11/04/2017 पर्यंत 04 आठवडयांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे रक्कम रुपये 49,45,600/- च्या 0.5 टक्केर नुसार रक्कम रुपये 24,728/- प्रती आठवडा याप्रमाणे संबंधितांकडून रुपये 98,912/- इतकी दंडाची रक्कम वसुल करावी.

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 2 नुसार शवदाहिनी आस्थापित झालेनंतर संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांचे स्वाक्षरीचा शवदाहिनी अहवाल व नमुना नंबर 18 (स्टॉक बुकात) नोंद घेऊन त्याचा उतारा सादर करणे आवश्यक आहे. असे नमुद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार पुरवठा आदेशात दिलेल्या ठिकाणी सर्व शवदाहिनी पुरवठा झालेचा अहवाल प्राप्त झालेनंतर 90 टक्के रक्कम अदा केली जाईल व उर्वरित 10 टक्का रक्कम सदरच्या शवदाहिन्या सुस्थितीत व महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचे तांत्रिक मापदंडा नुसार असलेबाबतचा शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांचा 100 टक्के तपासणी अहवाल व सदरच्या शवदाहिनी आस्थापित केलेचा अहवाल प्राप्त झालेनंतरच अदा केली जाईल. असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही व चेक क्रमांक 129950 दिनांक 29/03/2017 रक्कम रुपये 43,52,128/- अन्वये संबंधितांना प्रदान करण्यांत आलेली आहे.

**3.22 ग्रामीण विभागातील नाभिकांना मोजर मशिन पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** ग्रामीण भागातील नाभिकांना मोजर मशिन पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 19,79,444/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर निविदेची नस्ती तपासली असता पुरवठादार मे.भालचंद्र स्टोअर्स यांचे तांत्रिक लखोटयामध्ये सादर केलेल्या शॉप ॲ क्टनुसार त्यांचे धंद्याचे स्वरुप “बुकसेलर्स, स्टेशनरी, पेपरमर्चट व शालोपयोगी सहित्य विक्री” असे आहे. तथापि, मे.भालचंद्र स्टोअर्स यांना मोजर मशिन हे नाभिक व्यवसायासंबंधीचे साहित्य पुरवठा करणेबाबत अधिकृत पुरवठाधारक नसताना साहित्याचा पुरवठा केलेला आहे

2) निविदेतील नियम / अटी व शर्ती मधील अट क्रमांक 25 म्हणजेच तांत्रिक लखोटा, यामधील बाब क्रमांक 7 नुसार निविदाधारक उत्पादक नसल्यास अधिकृत विक्रेता असलेबाबतचे ज्यांचे उत्पादन असेल, अशा उत्पादकाकडील डिलरशीपचे पत्र आवश्यक आहे.

परंतु, पुरवठादाराने ZUBIN डिस्ट्रीब्युटर यांचे दिनांक 01/11/2016 रोजीचे पत्र सादर केले आहे, ज्यात ZUBIN डिस्ट्रीब्युटर यांनी स्पष्ट केले आहे की, ते WAHL pvt.ltd. या उत्पादकांचे डिलर असून मागणीप्रमाणे साहित्य पुरवठा करतील. याचा अर्थ पुरवठादार मे.भालचंद्र स्टोअर्स हे उत्पादकही नाहीत व उत्पादकाचे अधिकृत विक्रेताही नाहीत.

तथापि, डिलरकडून साहित्य खरेदी करून पुरवठादाराने पुरवठा केल्याने डिलर किंवा उत्पादक यांचा कमी दराचा लाभ मिळालेला नाही व जिल्हा परिषद निधीचे नुकसान झाले आहे. तसेच निविदाप्रक्रियेतील अटी व शर्तींचा भंग केला आहे.

3) एकेका गावातील बऱ्याच लाभार्थी/नाभिक व्यावसायिकांना लाभ दिला गेला असल्याचे दिसते. एकेका गावामध्ये 9 ते 24 इतक्या मोठ्या संख्येने नाभिक व्यावसायिक असण्याची शक्यता कमी वाटते. त्यामुळे लाभार्थी निवड अचूक न करता अनावश्यक खर्च केला आहे. याशिवाय एकाच गावास अधिक लाभ दिल्याने इतर गावातील पात्र लाभार्थी वंचित राहिले आहेत. तथापि, योजनेच्या हेतुनुसार लाभार्थी निवड दिसून येत नाही

4) लाभार्थी हिस्सा मार्च 2017 नंतर वसूल करणेत आला आहे. याचा अर्थ लाभार्थी हिस्सा न घेताच साहित्य खरेदी करून गटांना पुरवठा करणेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे तसेच देयकदेखील अदा करण्यात आले आहे. एकंदरीत लाभार्थी निवड प्रक्रिया योग्य प्रकारे राबविल्याचे दिसून येत नाही.

**3.23 नागरी सुविधा योजनातून ग्रामपंचायतीना प्रदान केलेल्या अनुदानातून (विक्रीकर, रॉयल्टी, विमा व उपकर) रकमा वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणाच्यावेळी ग्रामपंचायत विभागाकडील लेखे तपासले असता नागरी सुविधा योजनेतर्गत रक्कम रूपये 2,12,40,970/- जिल्हातील ग्रामपंचायतीना अनुदान प्रदान केले आहे. बांधकामाच्या अनुदानातून विक्रीकर, रॉयल्टी, विमा व उपकर यांच्या रक्कमा वजा करणे आवश्यक असताना तसे न करता सदरच्या रक्कमा ग्रामपंचायतस्तरावरुन कपात करण्यांचे आदेशात नमूद केलेले आहे. परंतु, वजातीच्या रकमा वजा करुन चलनाने शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. तसे ग्रामपंचायतीकडून भरणा करण्यात येत नाहीत. या कार्यालयाकडून सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणात सदर बाब निदर्शनास आणूनसुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही सन 2016-2017 या अर्थिक वर्षात करण्यात आल्यांचे दिसून येत नाही. तसेच ग्रामपंचायतीने कपातीच्या रक्कमा भरलेबाबत पोच पावत्या / चलने प्राप्त करुन घेतलेले नाहीत. संबधीत ग्रामपंचायतीकडून वजातीच्या रक्कमा वसूल करुन शासनाकडे भरणा करण्यात याव्यात.

**3.24 जिल्हा परिषद मुद्रणालयाच्या विविध विभागातीत छपाईच्या प्रलंबीत रक्कमा व वेतन भत्यावर झालेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** सामान्य प्रशासन विभागाच्या मुद्रणालयाकडून जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या छपाईची कामे केल्यानंतर सन 2011-2012 ते 2016-2017 पर्यंतच्या कामाचे रुपये 14,53,232/- च्या रकमा प्रलंबित असल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्थानिक निधी लेखा विभागाचे सन 2014-2015 चे परिच्छेद क्रमांक 2 नुसार परिच्छेद घेऊन सुध्दा सन 2016-2017 अखेर प्रचंड प्रमाणात थकबाकी असल्याचे दिसुन येते. सन 2016-2017 मध्ये फक्त शिक्षण विभागाकडून रूपये 55,557/- पैकी दिनांक 31/03/2016 रोजी रूपये 5,546/- एवढयाच रकमेची वसुली झाली. 2011-2012 पासुन थकीत रक्कमा वसुलीबाबत सामान्य प्रशासन विभागाने दिरंगाई केल्याने जिल्हा निधीचे नुकसान झालेले आहे.

2) सामान्य प्रशासन विभागाने जिल्हा निधीच्या विविध विभागाकडे इतक्या मोठया प्रमाणात रक्कमा थकीत असतांना त्या वसुल न करता जिल्हा निधीचे अंदाजपत्रकात कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यापोटी 7.00 लक्ष रुपयांची तरतुद करुन रूपये 6,24,028/- इतका खर्च नोंदविला. जर थकीत रकमा वसुल केल्या असत्या, तर जिल्हा निधीतील सदर तरतुद इतर लोकहितास्तव कामाकरीता वापरली गेली असती. सामान्य प्रशासन विभागाच्या अनास्थेमुळे जिल्हा निधीवर अनावश्यकरित्या रूपये 6.24 लक्ष एवढया रकमेचा भार निर्माण झाला.

**3.25 मुख्य कार्यकारी अधिकारी (कक्षासाठी) सी सी टी व्ही कॅमेरा संच खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** मुख्य कार्यकारी अधिकारी (कक्षासाठी) सी सी टी व्ही कॅमेरा संच खरेदी व कार्यन्वीत करणेकरिता रक्कम रूपये 1,16,828/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे कक्षासाठी सी सी टीव्ही संच खरेदी व कार्यन्वीत करणेसाठी 3 दरपत्रके प्राप्त झाली. 1) स्पेक्ट्रम इलेक्ट्रानिक्स, जालना 2) तेजल इन्फोटेक, तापडीया नगर, अकोला 3) ए एस.झेड इन्फोटेक, नाशिक हे तीन दरपत्रके प्राप्त झाली आहे. मागील वर्षाचा सन 2015-2016 चा लेखापरिक्षण अहवालातील

परिच्छेद क्रमांक 6 नुसार छत्रपत्री शाहु सभागृहाकरीता सी सी टीव्ही कॅमेरा संच खरेदी केलेला आहे ती खरेदी करतांना सुध्दा 1) स्पेक्ट्रम इलेक्ट्रानिक्स जालना, 2) तेजल इन्फोटेक तापडीया नगर अकोला व 3) ए एस.झेड इन्फोटेक, नाशीक या पुरवठाधारकांचे दरपत्रके प्राप्त झाल्याचे व खरेदी स्पेक्ट्रम इलेक्ट्रानिक्स, जालना यांचेकडुनच केल्याचे लेखापरिक्षण आक्षेपात नमुद केलेले आहे. म्हणजेच यावरुन हे स्पष्ट होते की, 2016-2017 मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षासाठी सी सी टीव्ही संच खरेदीसाठी केवळ दरपत्रके मागविल्याचा आभास निर्माण करुन सन 2015-2016 मध्ये ज्या पुरवठादाराकडुन सीसीटीव्ही संच खरेदी केला, त्याच पुरवठादाराकडुन सन 2016-2017 मध्ये सुध्दा खरेदी केली आहे. पुरवठादारासोबत संगनमत करुन व पुरवठादाराचे हित जोपासण्यासाठी केवळ दरपत्रके मागविल्याचा आभास निर्माण करुन दरवर्षी त्याच पुरवठादराकडुन खरेदी करणे, ही बाब गंभीर असुन सदर खरेदी ही पारदर्शक असल्याची खात्री पटत नाही. या बाबीकडे वरिष्ठांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

2) सी सी टी व्ही संच पुरवठा करणारे अकोला शहरात व इतर ठिकाणी सुध्दा अनेक पुरवठादार असतांना वारंवार दरवर्षी 1) स्पेक्ट्रम इलेक्ट्रानिक्स, जालना, 2) तेजल इन्फोटेक तापडीया नगर अकोला व 3) ए एस. झेड इन्फोटेक, नाशिक याच पुरवठादराचे दरपत्रके कशी प्राप्त होतात, याबाबत खुलासा करावा.

3) दरपत्रके केव्हा प्राप्त झाली, याबाबत आवक क्रमांक नमुद नाही. आवकमधून करुन घेण्यात आली नाहीत.

4) दरपत्रकाबाबत सुचना काढली. परंतु, ती जालना व नाशिक या पुरवठादारांना दरपत्रके भरण्यासंबंधी सुचना कशी प्राप्त झाली, याबाबत नस्तीमध्ये पोच आढळून आल्या नाहीत. खुलासा करावा.

5) पुरवठादारासोबत दुरुस्तीबाबत करारपत्र केल्याचे आढळले नाही तसेच साहित्याची वॉरंटी / गॅरंटी/ अभिलेखे आढळले नाही.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/ भाग III/ उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी करण्यापूर्वी उपलब्ध उत्पादनाची माहिती घेऊन बाजारातील सदर वस्तूचे दर काय आहेत, कुठल्याही परीस्थीतीत वस्तूचे दर किरकोळ विक्रीपेक्षा जादा आहेत काय, याची पडताळणी करणे आवश्यक असता केल्याचे आढळत नाही.

**3.26 ग्रामपंचायत अफरातफर/खास लेखाआक्षेपांबाबत अनुपालन अहवाल नस्ती, नोंदवही उपलब्ध न करणेबाबत जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकूण 236 प्रकरणांमध्ये रूपये 1.21 कोटी गुंतलेले आहेत. त्यापैकी 105 प्रकरणे निकाली निघाली असून उर्वरित 131 प्रकरणांबाबत त्वरीत निर्णय घेऊन अफरातफरीची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2) अफरातफर / खास लेखाआक्षेपांबाबत अनुपालन अहवाल नस्ती, नोंदवही उपलब्ध न झाल्याने निकाली निघालेल्या 105 प्रकरणांमधील समायोजित रक्कम रूपये 31,88,645/- योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही. सबब अनुपालन अहवाल नस्ती, नोंदवही व संबंधीत अभिलेखे सादर करावेत.

**3.27 चौदावा वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** चौदावा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान शासन निर्णय क्रमांक चौविआ /2016/ प्रक्र144/ वित्त4, दिनांक 31/08/2016 नुसार रुपये 18,00,07,000/- प्राप्त झाले असुन जिल्हा परिषद, वाशिम व्हावचर क्रंमाक 1 दिनांक 25/10/2016 रोजी रक्कम आहारीत करुन जिल्हयातील 491 ग्रामपंयातीना निधीचे वितरण केले आहे तथा शासन निर्णय दिनांक 02/01/2017 नुसार रुपये 18,00,07,000/- प्राप्त झाले असुन व्हावचर क्रंमाक 2 दिनांक 31/03/2017 रोजी रक्कम आहारीत करुन जिल्हयातील 491 ग्रामपंयातीना निधीचे वितरण केले आहे. एकुण रक्कम रुपये 36,00,14,000/- आहारीत करुन जिल्हयातील सर्व ग्रामपयांतीना आदेश क्रंमाक 7394 दिनांक 21/10/2016 व आदेश क्रंमाक 1569 दिनांक 31/03/2017 अन्वये वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय चौविआ 2015/प्र.क्र.26/वित्त-4, दिनांक 21/12/2015 ने ग्रामपंचायतीने करावयाची विकास कामे, त्याचे नियोजन व संनियत्रणाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. तसचे ग्रामपंचायत स्तरावर निधीच्या वितरणाचे नियोजन, नियंत्रण व समन्वयनची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत यांना देण्यात आली आहे. त्याकरीता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायत स्तरावरील खर्चाचा आढावा घेण्यास दर महिन्यास एक बैठक घ्यावी. निधीचे खर्चाबाबत उपयोगीता प्रमाणपत्र याबाबतचा ग्रामपंचायतचा मासिक अहवाल मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा. परंतू, मासीक अहवालाची प्रत नस्तीसह आढळली नाही.

2) कक्षाधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक चौविआ 2015/ प्र.क्र.26/वित्त-4, दिनांक 23/12/2015 नुसार 14 वा वित्त आयोग निधी खर्च करणेस कालबध्द कार्यक्रम ठरवून देण्यात आलेला आहे.

सदर वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करून घेण्याची जबाबदारी व संनियंत्रण उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांना दिलेले आहे. त्यानुसार कामे केली अगर कसे, याबाबतचा अहवाल नस्तीसह आढळून आला नाही.

3) खर्चाचे विनियोजन प्रमाणपत्रे तसेच सदर निधीतून किती कामे हाती घेतली, किती पूर्ण केली, याबाबत विवरणपत्रे आढळली नाहीत. तसेच उपरोक्त शासनाच्या पत्रानुसार मार्च 17 पर्यंत खर्चाबाबत आर्थिक व भौतिक अहवाल नस्तीसह आढळला नाही.

**3.28 ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणाबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीईएन- 2006/ प्र.क्र.771/आस्था-12, दिनांक 28/09/2006 अन्वये कार्यवाही करणे आवश्यक असतांना कार्यवाही न केल्यामुळे ग्रामपंचायतीची 1,447 चौकशी न केलेल्या अपहाराच्या प्रकरणांमध्ये रक्कम रूपये 36.70 कोटी गुंतवणूक पडलेली आहे. तसेच 2,481 चौकशी केलेल्या प्रकरणांमध्ये रक्कम रूपये 7.00 कोटी वसूल करावयाची आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 1096/ प्र.क्र.115/21 -अ, दिनांक 27/06/1996 अन्वये प्रत्येक महिण्यात अंतर्गत तपासणीकरीता ग्रामपंचायती संख्या निश्चित केलली असतांना सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्यामुळे ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणात वाढ झालेली आहे.

**3.29 अफरातफर प्रकरणांत गुंतलेल्या रकमांची 100 टक्के वसुली न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणाचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणाचे वेळी अफरातफर प्रकरणांचा आढावा घेतला असतांना दिनांक 31/03/2017 अखेर सामान्य निधीत एकूण 13 पंचायत समिती मधील एकूण 221 प्रकरणांमध्ये एकूण रुपये 5,35,15,736/- इतकी रक्कम गुंतून पडलेली आहे. तसेच जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्राम सडक योजना / संपूर्ण ग्रामीण रो़ जगारयोजना मध्ये 13 पंचायत समितीच्या 55 प्रकरणांमध्ये रुपये 6,54,378/- इतकी रकम गुंतुन पडलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक 2010/प्र.क्र.135/आस्था-12, दिनांक 28/05/2010 अन्वये पंचायतराज समितीच्या लेखापरिक्षण पुर्नविलोकन अहवालातील नमुद जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडील अपहार प्रकरणांबाबत दिर्घकाळ प्रकरणे प्रलंबीत राहत असल्याने शासकीय रकमा मोठया प्रमाणात गुंतून पडलेल्या आढळल्या.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक लेखा 2007/प्र.क्र.712/ वित्त 4, दिनांक 24/09/2008 अन्वये लेखापरिक्षणामध्ये उपस्थित केलेल्या गैरव्यवहार व अफरातफर प्रकरणी

ग्रामपंचायतनिहाय स्वतंत्र अभिलेखे तयार करुन संबधीत मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी वसुलीची कार्यवाही तात्काळ करुन त्याचा त्रैमासीक अहवाल विभागीय आयुक्तांना पाठवावा. परंतु, तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक व्हीची एम/2010/ प्र.क्र.242/परा 3, दिनांक 27/10/2010 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी, पंचायत हे सक्षम प्राधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे प्रलंबीत प्रकरणांचे चौकशी करुन वसुली करणेबाबत काटेकोर पालन करावे, असे निर्देश आहेत. परंतु, वसुलीची स्थिती पाहता ती अत्यंत कमी आहे. त्यामुळे शासन आदेशाची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने होत नसल्याचे दिसते.

4) जिल्हा परिषद स्तरावरुन प्रकरणांचा निपटारा केल्यानंतर अधिकृत दस्ताऐवजासह आदेशाची प्रत स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागास सादर करणे आवश्यक असतांना विभाग अशी कार्यवाही करीत नसल्याचे आढळते. त्यामुळे अफरातफर प्रकराणे व गुंतलेली रक्कम याचा ताळमेळ लेखापरिक्षणास घेता येत नाही. याबाबत निपटारा प्रकरणे आदेशाची प्रत स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागास सादर करण्यात यावी.

**3.30 ग्रामपंचायतींचे सखोल तथा सर्वसाधारण निरीक्षणाबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे परीपत्रक क्रमांक व्हीपीएम 2010/प्र.क्र.242/परा-3, दिनांक 27/10/2010 तसेच परीपत्रक क्रमांक संकीर्ण 1096/प्र.क्र.115/21अ, दिनांक 27/06/1996 नुसार विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी प्रत्येक महिन्यात 10 ग्रामपंचायतींचे सखोल निरीक्षण करणे आवश्यक आहे. तसेच गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक महिन्यात 2 ग्रामपंचायतींचे सखोल निरीक्षण व 8 ग्रामपंचायतींचे सर्वसाधारण निरीक्षण करायला पाहिजे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी माहे जुन आणि सप्टेंबर या महिन्यात प्रत्येक महिन्यात 5 ग्रामपंचायतींचे व उर्वरीत महिन्यात दरमहा 10 ग्रामपंचायतींचे, त्यापैकी 50 टक्के ग्रामपंचायतींचे सखोल निरीक्षण व 50 टक्के ग्रामपंचायतींचे सर्वसाधारण निरीक्षण करणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद यांनी प्रत्येक पंचायत समितीमधील 1 किंवा प्रत्येक वर्षात 10 ग्रामपंचायतींचे निरीक्षण तसेच विभागीय आयुक्त यांनी दरवर्षी प्रत्येक जिल्हयातील एका ग्रामपंचायतीचे सखोल निरीक्षण करणे आवश्यक आहे. सखोल तपासणी करताना संबंधित ग्रामपंचायतीचे नियमितपणे सखोल व सर्वसाधारण निरीक्षण न झाल्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर मोठया प्रमाणावर अपहार, अनियमितता व गैरव्यवहार होण्याची शक्यता आहे.

दिनांक 31/03/2014 अखेर जिल्हा परिषद, बुलडाणा येथे पंचायत समिती निहाय गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांचा ग्रामपंचायत निरीक्षणाबाबतचा (सखोल व सर्वसाधारण) अनुशेष 1,227 आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वर नमुद केल्यानुसार दिनांक 31/03/2017 अखेर गटविकास अधिकारी यांचा एकुण 516 ग्रामपंचायतींचा तसेच विस्तार अधिकारी (पंचायत) यांचा एकुण 1,227 ग्रामपंचायतींचे सखोल अथवा सर्वसाधारण निरीक्षणाचा अनुशेष बाकी आहे. अनुशेष भरुन काढुन अनुपालन करावे

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी सन 2016-2017 मध्ये ग्रामपंचायतींचे केलेले सखोल तथा सर्वसाधारण निरीक्षण अहवालाची मागणी करुनही सदर निरीक्षण अहवाल व त्याबाबतची आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही. त्यामुळे याबाबतचा अनुशेष समजु शकला नाही याबाबत अनुशेष असल्यास तो भरुन काढून लेखापरीक्षणाची त्याबाबत खात्री पटवुन अनुपालन करावे.

**3.31 14 वा वित्त आयोगातर्गंत परफॉर्मन्स ग्रँटचे नविन पुनर्वसित गावांना वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** प्रमाणक क्रमांक 3/ 20/03/2016 रुपये 7,28,84,000/- अन्वये सन 2016-17 या आर्थीक वर्षाचे 14 वा वित्त आयोगातर्गंत जनरल परफॉर्मन्स ग्रँटच्या हप्ता अनुदानाचे वितरण केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक चौविआ-2015/प्र.क्र.26/वित्त-4, दिनांक 28/04/2016 नुसार चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडुन राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी प्राप्त होणारा जनरल परफार्मन्स ग्रँट मिळण्याकरीता पात्र ठरविण्यासाठी दोन अटीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(अ) ग्रामपंचायतींनी त्यांचे लेखे ठेवणे आवश्यक असुन त्यांचे अद्यावत (दोन वर्षाच्या आतील कालावधीचे) लेखापरीक्षण झाले असावे उदा. सन 2016-17 या आर्थीक वर्षाचे परफॉर्मन्स ग्रँट मिळण्याकरीता पात्र ठरण्यासाठी सन 2014-15 या आर्थीक वर्षाचे लेखापरीक्षण झालेले असावे.

(ब) ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नात मागील वर्षापेक्षा वाढ झालेली असावी तसेच ग्रामपंचायतींनी विहित केलेल्या 100 गुणांपैकी किमान 85 गुण मिळविणे आवश्यक राहील.

18 ग्रामपंचायतीची स्थापना सन 2015-16 मध्ये झालेली असतांना तसेच ग्रामपंचायत नेरी सावरगाव (पुनर्वसित) तसेच ग्रामपंचायत नागतरोली (पुनर्वसित), जांभुर्डा व ग्रामपंचायत सिर्सी (पुनर्वसित) तसेच ग्रामपंचायत नवेगाव (सिर्सी)-सोनारवाही-उमरी (पुनर्वसित) एकाच अधिसुचनेनुसार नव्याने पुनर्वसित झालेल्या गावे असतांना नेरी सावरगाव (पुनर्वसित), नवेगाव (सिर्सी)-सोनारवाही-उमरी (पुनर्वसित) ग्रामपंचायतीला अनुज्ञेय ठरत नसल्याचे नमुद करुन नागतरोली (पुनर्वसित), सिर्सी (पुनर्वसित) ग्रामपंचायतीला अनुज्ञेय कसे काय ठरविण्यात आले.

तरी वरील ग्रामपंचायत नव्याने स्थापीत झालेली असुन शासन निर्णयातील अटीची पुर्तता करीत नसतांना सुध्दा सन 2016-17 या आर्थीक वर्षाचे परफॉर्मन्स ग्रॅटचे नियमबाह्य वितरण करण्यात आल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे. तरी सदर रक्कम संबंधीत ग्रामपंचायतीकडुन वसुल होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक चौविआ-2017/प्र.क्र.7/वित्त-4, दिनांक 25/01/2017 नुसार परफार्मन्स ग्रॅटच्या वितरणाबाबत सुधारीत तरतुदीनुसार ज्या ग्रामपंचायतींनी परफॉर्मन्स ग्रँट मिळण्यासाठी पात्रता निकषांची पुर्तता केली नसेल, त्यामुळे सदर ग्रामपंचायतीच्या हिश्याची संबंधीत आर्थीक वर्षाच्या ग्रॅटची रक्कम इतर अटीची पुर्तता करणाऱ्या पात्र ग्रामपंचायतीमध्ये सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 90 टक्के व क्षेत्रफळ 10 टक्के या निकषाआधारे यथायोग्य घटीत प्रमाणात वितरीत करण्यात यावे असे असतांना सुध्दा संबंधीत अपात्र ग्रामपंचायतीची रक्कम इतर पात्र ग्रामपंचायतीला वितरीत केले नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे. तरी सदर वर्षाची रक्कम वसुल करुन शासन निर्णयानुसार अनुपालन करावे.

3) ज्या 764 पात्र ग्रामपंचायतीला परफॉर्मन्स ग्रॅटचे वितरण केलेले आहे, त्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ झाल्यासंबंधी कोणताही अधिकृत दस्ताऐवज नस्तीबध्द नसल्याने तसेच संबंधीत पंचायत समितीकडुन उत्पन्नात वाढ झाल्यासंबंधी योग्य दस्ताऐवजाच्या आधारे माहिती न मागविल्याने मोघमरित्या संबंधीत 764 ग्रामपंचायतीला पात्र ठरवुन परफॉर्मन्स ग्रॅटचे वितरण केल्याचे स्पष्ट होते.

**3.32 जिल्हा वार्षिक योजनेतर्गंत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदानाचे प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामपंचायतींना रक्कम रूपये 13,99,554/- अनदुान वितरण केल आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणक क्रमांक 2296 ची तपासणी केली असता पंचायत समिती उमरेड अंतर्गत बेला ग्रामपंचायतीच्या भवन बांधकामाकरीता रुपये 50 लक्ष मंजुर आलेले असुन शासन निर्णयानुसार 90 टक्के अनुदानापैकी रुपये 39,61,885/- वितरीत करण्यात आलेले आहे. तरी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2610/प्र.क्र.129/परा-4, दिनांक 16/09/2010 नुसार ग्रामपंचायतीचा नियोजनबध्द विकास करुन या गावांना विकास केंद्र म्हणुन विकसीत करतांना ग्रामविकास व पर्यावरण आराखडा

तयार करुन त्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच नियोजनबध्द विकास, बाजारपेठ विकास, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, बागबगीचे उद्यान तयार करणे, अभ्यास केंद्र, भुमीगत नाली बांधकाम, रस्ते बांधकाम या सुविधा योजनेतर्गत मंजुर करणेबाबत सदर वरील शासन निर्णयात नमुद आहेत, परंतु सदर योजनेत ग्रामपंचायत भवन बांधकाम करता येत असल्याबाबत बाब नमुद नसतांना कामास मंजुरी प्रदान केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांक व्हीपीएम-2610/प्र.क्र.129/पंरा-4, दिनांक 20/10/2011 नुसार एका वर्षात कोणत्याही ग्रामपंचायतीला सर्व कामांसाठी एकुण निधी 50 लाखापर्यंत मंजुर करता येतील, असे असतांना ग्रामपंचायत बेला येथील भवन बांधकाम या एकाच कामाला रुपये 50 लक्ष मंजुर करण्यात आल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे इतर विकास कामाकरीता निधी उपलब्ध करता आला नसल्याने योजनेचा मुळ उद्देश साध्य झाला नाही.

2) तसेच प्रमाणकाला संलग्न मंजुर विकास कामांच्या यादीची तपासणी केली असता पंचायत समिती नागपूर मधील ग्रामपंचायत बेसा, ग्रामपंचायत लावा अंतर्गत वार्ड क्र. 2,3,4 मधील कामे, पंचायत समिती उमरेड येथील ग्रामपंचायत पाचगाव अंतर्गत 9 कामे, पंचायत समिती पारशिवनी येथील ग्रामपंचायत टेकाडी वार्ड क्र.1 येथील कामाचे नाव सिमेंट रोड व नाली बांधकाम मंजुर असल्याचे दिसुन आले. वरील शासन निर्णय शुध्दीपत्रक दिनांक 20/10/2011 नुसार सांडपाणी व्यवस्थापनासाठी भूमीगत नाल्यांचे बांधकाम करणे मंजुर करता येत असतांना वरीलप्रमाणे नाली बांधकाम असे नमुद असल्याने उघडी नाली बांधकाम मंजुर केल्याचे स्पष्ट होते. याबाबत योग्य त्या दस्ताऐवजासह भुमीगत नाली बांधकाम केले किंवा कसे याबाबत अनुपालन सादर करावे.

3) वरील मंजुर विकास कामे ही विहीत मुदतीत पुर्ण करणे आवश्यक असुन, त्याबाबत कामनिहाय आर्थीक व भौतिक अहवाल प्राप्त करणे तसेच उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना संबंधीत नस्तीची तपासणी केली असता कामाचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र केल्याचे दिसुन आले नाही.

### 3.33 ग्रामपंचायत स्तरावरील लेखाआक्षेप प्रलंबित असल्याबाबत.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करीत असतांना सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत पंचायत विभागाकडील ग्रामपंचायतीचे सुमारे 24,224 इतके लेखा आक्षेप प्रलंबित आहे. सन 2016-2017 मध्ये शिबीरे घेऊन फक्त 68 परिच्छेद वगळण्यात आलेले आहे. सदरची टक्केवारी पाहता ही अत्यंत कमी असल्याचे दिसुन येत आहे. दरवर्षी ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण होऊन त्यात परिच्छेदाची दिवसेंदिवस वाढ होत आहे. सदर बाबी करिता अर्धसमासपत्र क्रमांक 10 दिनांक 12/09/2017 देऊनही उत्तर विभागाकडून सादर करण्यात आले नाही. करिता ग्रामपंचायतीचे लेखा आक्षेप निकाली काढण्याकरीता ठोस कार्यवाही करणे आवश्यक आहे.

### 3.34 जिल्हा परीषद वर्धा अंतर्गत जिल्हा परीषद सभागृहात सी सी. टी. व्ही. कॅमेरे लावणेमधील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 326 दिनांक 01/07/2016 अन्वये रक्कम रुपये 98,190/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी दिलेले मौखिक आदेशानुसार संदर्भ टिपणीमध्ये दिलेला आहे. परंतु, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आली किंवा नाही, याबाबत अभिलेखे नस्तीत नाही. कॅमेरे खरेदीबाबत अंदाजपत्रकामध्ये कोणतीही तरतुद नाही. तसेच कार्योत्तर मंजुरी नस्तीत नाही.

2) सी. सी. टी. व्ही. संबंधित जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. त्यामध्ये SPECIFICATIONS नमुद नाही. त्यामुळे कोणते सी. सी. टी. व्ही. कॅमेरे खरेदी करण्यात आले आहे. याबाबत खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लोलेस-2015/प्र.क्र.114/वित्त-4, दिनांक 17/11/2015 मधील बाब क्रमांक 02 नुसार संयंत्र किंवा उपकरणे खरेदी करण्यात येत असलेल्या संयंत्र किंवा उपकरणे खरेदी संबंधीत देखभालीच्या किंवा अन्य सहाय्यकारी सेवांसाठी करार जसे सर्वसमावेशक देखभाल किंवा

वार्षिक देखभाल करार (AMC) हा उपकरणाच्या खरेदी बरोबरच प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना वार्षिक देखभाल करार (AMC) केल्याचे दिसुन येत नाही.

4) डिलिव्हरी चालान लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

5) साठा पुस्तक लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

6) जिल्हा परिषद सभागृहात सी सी. टी. व्ही. कॅमेरे लावून दिल्याचे (Installation) पुरवठादाराचे प्रमाणपत्र तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही.

**3.35 अल्पसंख्यांक बहुल योजनेंअंतर्गत ग्रामपंचायतींना सहायक अनुदान वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत रक्कम रूपये 40,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय अल्पसंख्यांक सा प्र वि 2013/प्र.क्र.अ/10, दिनांक 14/05/2013 नुसार सदर योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे वेळापक देण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करुन वेळापत्रक तयार करुन कामे पूर्ण करावयाची असतांना त्या नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

2) वरील प्रमाणकानुसार रक्कम रुपये 40 लक्ष कोषागारातुन आहरीत करण्यात आले आहे. परंतु, लेखापरिक्षणाचे दिनांकापर्यंत सदर रक्कम संबंधीत पंचायत समिती, ग्रामपंचायत यांना वाटप केल्याचे नस्तीवरुन दिसून आले नाही. योग्य नियोजनाअभावी रक्कम आहरीत करुन योजना न राबविता विनीयोग प्रमाणपत्र सादर केल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-1001/प्र.क्र.1144, दिनांक 24/12/2001 अन्वये अनुदान ग्रामपंचायतींना अनुदान वाटपाबाबत धनादेशाने ग्रामपंचायतींना प्रदान केल्याबाबत, धनादेशांच्या स्थळ छायांकित प्रती पहावयास मिळाले नाही.

4) ग्रामपंचायतीस अनुदानाची रक्कम दिल्यानंतर विहीत नमुन्यात नमुना नंबर 7 ची किरकोळ वसूलीची पावती घेतली नाही.

5) वित्त विभाग, जिल्हा परिषद भंडारा यांचे सोबत खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र, खर्चाचे ताळमेळ व विनीयोग लेखे इत्यादी बाबत अजुनपावेतो कार्यवाही पुर्ण झालेली नाही

6) पुर्ण कामाचे उपयोगीता मुल्य, प्रमाणपत्र, मोजमाप पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती, पुर्णत्वाचा दाखला पंचायत विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु लेखापरीक्षणास उपलब्ध कलेले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 67(1) नुसार पंचायत विभागाने कामाची नमुना 23 मध्ये प्रगती नोंदवही ठेवणे आवश्यक असुन ती ठेवली नसल्याने मंजुर कामे, पुर्ण, अपुर्ण कामे याबाबत खात्री करता येत नाही.

**3.36 मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींचे पर्यावरण विकास आराखडे तयार करनेचे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदर बाबत रक्कम रूपये 4,46,087/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम 2011/प्र.क्र. 173/पंरा-4, दिनांक 24/08/2011 नुसार सदर ग्रामपंचायती पर्यावरणीय संवेदनशील भागामध्ये समावेश होणाऱ्या, तिर्थक्षेत्र / पर्यटन क्षेत्रदृष्ट्या महत्व असणा-या, औद्योगीक क्षेत्रात येणा-या, प्रमूख नागरी क्षेत्राच्या 05 किलोमिटर परीघामध्ये येत असलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम 2011/प्र.क्र. 173/पंरा-4, दिनांक 24/08/2011 चे परिच्छेद 4 चे वेळापत्रकाचे पालन केलेले नसून ग्रामपंचायतीसाठी तांत्रिक सेवा

पुरवठादाराची निवड 15 ऑक्टोंबर, 2011 पर्यंत करावयाची असतांना 04 वर्षे व 09 महिण्याचे विलंबाने 15 जूलै, 2016 चे समिती सभामध्ये निवड केल्याचे नस्तीवरून दिसून येते.

3) रूपये 8,900/- चे मुद्रांक शूल्काचे स्टॅम्प पेपरवर करारनामा करने आवश्यक असतांना रूपये 100/- वर केल्यामूळे रूपये 8,800/- चे शासन महसूलाची हानी झालेली आहे.

4) हर्षल ग्रामिण विकास बहुउद्देशिय संस्था चंद्रपूर यांना पर्यावरण विकास आराखडा तयार करणेचे तांत्रिक सेवेकरीता रूपये 97,17,500/- अदा केले असून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5, दिनांक 22/02/2008 मधील आयकर कपातीबाबतचे कलम 194 जे नुसार तांत्रीक सेवेकरीता 10 टक्के आयकर रूपये 9,71,750/- कपात करावयाचे असतांना प्रथम अग्रीम देयकातून रूपये 5,34,463/- कपात केले असून इतर प्रदान देयकातून आयकर कपात न केल्याने रूपये 4,37,287/- कमी आयकर कपात केलेले आहे.

**3.37 ग्रामपंचायत अफरातफर रक्कमेची वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

सन 2016-2017 मध्ये सामान्य प्रशासन विभागाचे लेखापरीक्षण करतांना असे निदर्शनास आले की, ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणाची दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रुपये 19,83,308/- वसुली अभावी ग्रामपंचायतीकडे प्रलंबीत असल्याचे दिसून येते. सदर अग्रीमाबाबत खंड विकास अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. अग्रीम वसुलीबाबत योग्य् ती कार्यवाही करून तसा अहवाल सादर करण्यात यावा

**3.38 मॉडयुलर फर्निचर खरेदी.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदर बाबत रक्कम रूपये 26,08,416/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता वित्त, पशुसंवर्धन, समाजकल्याण इत्यादी विभागाकरीता 27 लक्ष अंदाजपत्रकामध्ये तरतुद केली असताना सामान्य प्रशासन विभागावरील फर्निचर खरेदी अंदाजपत्रकीय तरतुद नसताना करणे नियमबाहय आहे.

2) दोन्ही देयके INTERIOR FURNISHING & MODULER FURNITURE (CUSTOMIZE) या एकाच कामावरील असताना एकत्र निविदा प्रक्रिया न राबविता कामाचे तुकडे पाडून खरेदी करणे व रक्कम प्रदान करने नियमबाहय आहे.

3) अर्धसमास पत्र क्रमांक 2 नुसार मागणी करूनही संबधीत कामाची टिपनी/ निविदा/ खरेदी फाईल लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने कामाची जाहीरात, कामाचे अंदाजपत्रक, निविदा सादर करणाऱ्याचे तांत्रिक व प्रशासकीय बाबींचे दस्तऐवज, करारनामा, निविदा अटी शर्ती, डीलीवरी मेमो, चाचणी अहवाल, साठा पुस्तक, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व त्या अनुषंगाने इतर आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे निविदा व खरेदी प्रक्रिया बरोबर असल्याची खात्री करता आली नाही.

4) E-TENDER BID वर निविदा समितीतील अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी नाही.

5) खरेदी केलेल्या वस्तुच्या गुणवत्तेबाबत व सध्याच्या बाजार भावानुसार दर योग्य असल्याबाबत खरेदी अधिका-याने प्रमाणपत्र न देताच साहित्याची खरेदी केली आहे.

6) मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 नुसार नोंदणी प्रमाणपत्र मधील 4 मध्ये नोंदणी कार्यकंत्राट विषयक असल्यास देयकातून 2 टक्के मुल्यवर्धीत कर रूपये 52,168/- व नोंदणी इतर बाबीकरीता असल्यास 5 टक्के प्रमाणे कर रूपये 1,30,421/- कपात करून शासन लेखाशीर्षात जमा होणे आवश्यक आहे.

7) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रूपये 52,168/- कपात करून शासन लेखाशीर्षात जमा होणे आवश्यक आहे.

**3.39 वाहन सुटेभाग खरेदी व दुरूस्तीवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर बाबत रक्कम रूपये 4,00,275/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन क्रमांक MH34-8604 वर सन 2016-2017 मध्ये देखभाल दुरूस्तीवर रूपये 1,01,198/- खर्च झालेला आहे. विभागीय आयुक्त यांनी त्यांचे पत्र क्रमांक 130/736/2017 दिनांक 06/03/2017 अन्वये अतिरिक्त रूपये 25,000/- च्या खर्चास मान्यता दिलेली आहे. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 29/09/2015 नुसार वाहनाचा देखभाल दुरूस्ती खर्च सर्व निधी मिळुन (विमासह) रूपये 50,000/- मर्यादेत असणे आवश्यक आहे. अतिरिक्त रूपये 25,000/- खर्चास मान्यता मिळाल्यामुळे झालेल्या खर्चापैकी रूपये 75,000/- वजा करता मर्यादेपेक्षा जास्त केलेला खर्च रूपये 26,198/- वसूलपात्र ठरते.

2) वाहन क्रमांक MH34-8604 चे टायर बदलविणेबाबत ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक 31/08/1999 चे ड-3 नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 31/08/1999 नुसार वाहन दुरुस्ती करणे आवश्यक असल्याबाबत तांत्रिक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतले नाही.

4) वार्षिक दरपत्रक मागवून त्यानुसार किमान दराने वाहनाचे सुटे भाग खरेदी व देखभाल दुरूस्ती होणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दरामध्ये तफावत दिसून येते.

5) सदर वाहनांची दुरुस्ती होऊन वाहन योग्य असल्याबाबतचे तांत्रिक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नस्तीला आढळून आले नाही.

6) सदर वाहने दुरुस्ती केल्यानंतर निकामी झालेले वाहनाचे सुटे भाग साहित्याची नोंदवही ठेवण्यात आल्याचे तसेच त्यांची विक्री करुन रक्कम जमा करण्यात आल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही. भांडारात जमा केलेले जुने साहित्याची नोंदवही लेखापरीक्षणात सादर करण्यात आली नाही. त्यामुळे जुने साहित्य तसेच पडून त्याची नियमानूसार लिलावाद्वारे विक्री करुन येणारी रक्कम शासकीय कोषागारात भरणा केल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही.

7) वाहन क्रमांक MH34-8610 वर आर्थिक वर्षात पेट्रोल खरेदी 4449 लिटर झाल्याचे दिसून येते. म्हणजे विहित केलेल्या मर्यादेपेक्षा 449 लिटर जास्तीचे पेट्रोल वापरले आहे. याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

**3.40 मुद्रांक शुल्क अनूदान वितरीत न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** मुद्रांक शुल्क अनूदान एकूण रूपये 80,66,470/- वेळोवेळी कोषागारातून आहरीत केलेले असून वितरणाअभावी संकिर्ण खाती शिल्लक असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायतीच्या क्षेत्राधिकारात झालेल्या स्थावर मालमत्तेच्या व्यवहारासंदर्भात त्यांना अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्क अनुदानाच्या 50 टक्के रक्कम संबंधित जिल्हा परिषदांनी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीत जमा करणेबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 मधील कलम 158(4) मध्ये तरतूद आहे. 73 वी घटनादुरूस्ती (पंचायती राजसुधारणा) दिनांक 30/04/1993 नूसार पंचायत राज संस्थांना (ग्रामपंचायती) आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी त्यांना देय असलेले अनुदान विहित वेळेत/मुदतीत प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीटी-2015/प्र.क्र.40/वित्त-03, दिनांक 19/01/2016 व शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हा परिषदांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले ग्रामपंचायतींचे मुद्रांक शुल्क अनुदान प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील 15 दिवसाच्या आत संबंधित ग्रामपंचायतींकडे विहीत कार्यपध्दतीनुसार सुपूर्त करणे व त्याचा अनुपालन अहवाल आयुक्त व शासनास सादर करण्याबाबतच्या सुचना प्राप्त आहे. असे असतांना पंचायत विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी सन 2014-2015, 2015-2016, 2016-2017 या कालावधीत ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदान वितरण केलेला नाही

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीटी-2015/प्र.क्र.40/वित्त-03, दिनांक 19/01/2016 नुसार जिल्हा परिषदांना हे अनुदान प्राप्त झाल्यानंतर अनुदान प्राप्त झाल्याचा दिनांक व मिळालेली रक्कम याबाबतची माहीती शासनास व महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अनुदानाचे ताळमेळ घेण्याकरीता पाठविणे आवश्यक आहे. पंचायत विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडून सदर माहीती शासनास व महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेली नाही.

**3.41 यात्रा स्थळांना व्यवस्थापनासाठी अनुदान देण्याबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे यात्रा स्थळांना व्यवस्थापनासाठी अनुदान देण्यासाठी प्रमाणक क्रमांक 1815, दिनांक 31/03/2017 नुसार रुपये 8,00,000/- तरतुदीचे खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 77 (2) नूसार पंचायत समितींकडून रकमा प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या प्राप्त केलेल्या नाहीत.

2) सबंधीत ग्रामपंचायतींना अनुदान प्राप्त झाल्याबाबत त्यांचेकडून नमूना 7 मधील पावती घेतलेली नाही.

3) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चामोर्शी यांचे पत्र क्रमांक पंसचा/विअपं/पंचा/1179/2017, दिनांक 19/05/2017 नुसार मार्कंडादेव यात्रा सन 2016-2017 च्या जमा खर्चाची माहीती व उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले. मार्कंडादेव यात्रा वगळता इतर कोणत्याही यात्रास्थळांचे जमा खर्चाचे विवरण व उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

4) पंचायत समितीस्तरावर वाटप केलेल्या अनुदानाच्या खर्चाचा ताळमेळ पंचायत विभागाकडून घेण्यात येत नाही.

**3.42 घसारा निधीतून गटविकास अधिकारी यांचेसाठी खरेदी केलेल्या वाहनांबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** DGS & D यांचे दरकरारनुसार सदर वाहन खरेदीसाठी प्रमाणाक क्रमांक 135 माहे-आक्टोंबर 2016 अन्वये रुपये 33,28,261/- वाहन खरेदीसाठी (Proforma Invoice क्रमांक.1446/16-17 दिनांक 31//08/2016, रुपये 33,28,261/-, (प्रति वाहन रुपये 5,54,710/-) व रुपये 1,50,000/- विम्यासाठी अग्रिम देण्यात आला होता. संबंधितास दिनांक 04/11/2016 रोजी वाहन पुरविण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर वाहन खरेदीवर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) DGS & D यांचा दरकरार क्रमांक UT-VEH/AM-4/RC-2J020000/0716/74/02843/1094/3 दिनांक 11/09/2015 ते 12/05/2016 या कालावधीत वैध होता. तथापि पुरवठा आदेश दिनांक 04/11/2016 रोजी देण्यात आला आहे. त्यामुळे केलेली वाहन खरेदी अनियमित आहे.

2) Proforma Invoice नुसार प्रति वाहनाची किंमत रुपये 5,54,710/- होती व त्यानुसार देयक मंजूर करून रक्कम आहरीत करण्यात आली होती. तथापि पुरवठादारास Invoice क्रमांक 959962940 ते 45 दिनांक 30/11/2016 अन्वये प्रत्येकी रुपये 5,57,829.76/- (पुर्नांकित रुपये 5,57,830/-) प्रमाणे रुपये 33,46,980/- ऐवजी रुपये 33,56,638/- (33,28,261/-+28,377/-) NEFT द्वारे प्रदान करण्यात आले आहे. वाढीव खर्च (रुपये 28,377/-) विम्याच्या रकमेतून केल्याचे दिसून येते. तसेच वाढीव खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 51 नुसार मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच पुरवठादारास रुपये 9,658/- जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

3) विभागीय आयुक्त यांचे आदेश क्रमांक 301/2016 दिनांक 10/05/2016 अन्वये सदर वाहन निर्लेखनास मान्यता दिली असतांना लेखापरीक्षण दिनांकापावेतो वाहने निर्लेखित करण्यात आलेली नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 210 (ब) नुसार विभागाध्यक्ष यांच्या मंजुरीने रुपये 1,000/- पर्यंतचे अग्रिम मंजूर करता येतील. त्यासाठी पूर्वीच्या कोणत्याही आगाऊ रकमेचे समायोजन व्हावयाचे राहिलेले नसावे. तथापि लेखासंहीतेतील सदर तरतुदीचे पालन केलेले दिसून येत नाही.

**3.43 घंटागाडी खरेदी मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** घंटागाडी खरेदीकरिता रक्कम रूपये 1,70,99,589/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक संकींण 1000/प्र.क्र.114/कोबा/4, दिनांक 11/02/2000 नुसार आर्थिक वर्ष अखेरीस दिनांक 15 फेबूवारी नंतर कोणतेही साहित्य बाबीवर खर्च करू नये. असे असतांना दिनांक 28/02/2017 रोजी खरेदी करण्यात आली.

2) करारनामा अन्वये चार चाकी घंटागाडीचे विहीत ISO दर्जा असलेबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही व याबाबत संचिकेत अभिलेखे दिसून आले नाही. खरेदी केलेल्या घंटागाडी हा आय. एस.ओ. दर्जाचा नसल्यास उपरोक्त शासन निर्णयकडे हेतु पुरस्पर दुर्लक्ष करुन खरेदी केल्याची रक्कम नाकारता येत नाही.

3) निविदेतील वर्णनुसार घटांगाडी ग्रामपंचायतीस प्राप्त झालेबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) प्रमाणे प्रत्यक्ष पुरवठा झालेबाबतचा दिंनाकींत पोच पावती लेखापरीक्षणामध्ये संचिकेत दिसुन आली नाही. त्यामुळे घंटागाडी संबंधित ग्रामपंचायतीना वेळेत पोच झाल्याचीव तिचा वापर योग्य त्या कारणासाठी झाल्याची खात्री पटत नाही.

4) पुरवठा आदेशामध्ये नमुद केल्याप्रामाणे खरेदी केलेल्या घंटागाडीची परीवहन कार्यालयाकडील विमा सरंक्षण व इतर आवश्यक कागदपत्रे व वॉरंटीं प्रमाणपत्र संबधित पुरवठा केलेल्या ग्रामपंचायतकडे सुपुर्द केलेबाबतची खात्री अभिलेख्यावरुन झाली नाही

5) ई - निविदा ऑनलाईन निविदा विक्री व स्विकृती दिंनाक 02/09/2016 ते 15/09/2016 नमूद असतांना दिनांक 08/09/2016 रोजी निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली व निविदा कालावधी दिनांक 02/09/2016 पासुन उपलब्ध असल्याबाबत नमुद आहे. यावरुन प्रत्यक्ष निविदा कालावधी 8 दिवसच दिल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे कामाची पुरेश्या प्रसिध्दीचा स्पर्धात्मक दरांचा फायदा होऊ शकला नाही.

6) घंटागाडी चालकाचे वेतन व इंधन खर्च भागविण्याबाबत ग्रामपंचायत सक्षम असल्याचे ग्रामंपचायत प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

7) सदरची खरेदी ही जिल्हा वार्षिक योजनेतुन करण्यात आली असुन नियोजयन विभाग, शासन निर्णय क्रमांक जिएपी-101४/प्र.क्र.198/का.1481, दिनांक 27/08/2014 मधील परीशिष्ट अ मध्ये मुद्दा क्रमांक 5 मधील उपमुद्दा क्रमांक 7 मध्ये कोणत्याही स्वरुपाची वाहन खरेदी करता येणार नाही, असे नमुद असतांना घंटागाडी वाहनाची खरेदी नियमबाह्यरीत्या करण्यात आली आहे.

8) तसेच उपरोक्त नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिएपी-101४/प्र.क्र.198/का.1481, दिनांक 27/08/2014 मधील मुद्दा क्रमांक 2 नुसार मागिल योजना पुन्हा राबवयाची असल्यास मागील वर्षाचा अनुभव योजनेची फलनिष्पत्ती इत्यादीचा अभ्यास करून निर्णय घ्यावा, असे नमुद असतांना सन 2014-2015 मधील 62 घंटागाडी खरेदीची फलनिष्पत्ती अहवालासोबत संचिकेत जोडलेला नाही.

9) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जिएपी-101४/प्र.क्र.198/का.1481, दिनांक 27/08/2014 मधील मुद्दा क्रमांक 12 प्रमाणे नाविन्यपुर्ण योजनांची त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करून अहवाल शासनास सादर करावा. तथापि, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) तथा सचिव निविदा समिती यांचे आदेश क्रमांक पंचा-5/कावि/ 2017, दिनांक 05/01/2017 नुसार जिल्हा परीषद जालना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनसाठी ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या घंटा गाड्यांची तांत्रिक तपासणीचे आदेश उपअभियंता (यांत्रिकी), जिल्हा परिषद, जालना व श्री. डी. पी. जोशी (वरीष्ठ सहाय्यक लेखा) प्रस्तुत कार्यालय यांना देवुन यांना तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले व त्याप्रमाणे त्यांनी तपासणी केली वास्तिविक शासन निर्णयामध्ये नमुद त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन न करता जिल्हा परिषदेमधीलच उपरोक्त कर्मचाऱ्यांनी तपासणी करण्याचे प्राधिकार दर्शवावेत.

10) सन 2014-2015 मधील योजनेचा लाभ दिलेल्या ग्रामंपचायतीनाच दुबार लाभ न दिल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडले नाही.

**3.44 ग्रामपंचायत कर्मचारी, सरपंच, सदस्य बैठक भत्ता मानधन यांचे अनुदान वितरणा बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद बीड चे सन 2016-17 मध्ये ग्रामपंचायत कर्मचारी, सरपंच मानधन, सदस्य बैठक भत्ता अनुदान खालील विवरणपत्रा नुसार वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.ए/2699/प्र.क्रमांक206 (1) 21 दिनांक 21 जानेवारी 2000 नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या 50% अनुदान शासनाकडून प्राप्त करावयाचे आहे. ग्रामपंचायतीने प्रथम 100% वेतन प्रदान करुन 50% वेतन अनुदानाची मागणी करणे आवश्यक आहे अशी मागणी प्राप्त न करताच अनुदान वितरीत केले आहे. निधी वितरण आदेशानंतर विलंबाने कोषागारातुन अहरण केल्या नंतर बर्याच विलंबाने वाटप केलेले आहे.

2) महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्ही.पी.एन2006/प्र.क्रमांक172 पंरास-3, दिनांक 29/03/2007 नुसार शासनाचे ग्रामपंचायती करिता लोकसंख्ये नुसार कर्मचारी आकृतीबंध लागू करुन किमान वेतन ठरवून दिल्याप्रमाणे वेतन अदाई करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशी माहिती उपलब्ध न करता वेतन अनुदान अदा केले आहे. त्यामुळे लिपीक दिवाबती कर्मचारी, शिपाई असा संवर्ग निहाय निकष न लावता अनुदान ढोबळ स्वरुपात वितरीत केले आहे. त्यामुळे अनुदान ग्रामपंचायतीस कर्मचाऱ्याच्या तुलनेत कमी अधिक अनुदान वाटप केल्याचे दिसते. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.2012/ प्र.क्रमांक235/पंरा-3, दिनांक 04/03/2014 नुसार शासनाचे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्यासाठी ग्रामपंचायतीची कुवत नसल्यामुळे काही ग्रामपंचायती किमान वेतन देऊ शकत नसल्याने ग्रामपंचायतीच्या लोकसंख्या व उत्पन्नानुसार ग्राम पंचायतीची वर्गवारी करून त्यानुसार 100%, 75% व 50% किमान वेतनासाठी शासन हिस्सा अनुदानास पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीनी नियमाप्रमाणे चार वर्षांनी फेरआकारणी करणे व गत वर्षाची 90% कराची वसुली करणे बंधनकारक राहील अशी कार्यवाही केल्याची माहिती उपलब्ध न करताच अनुदान वितरीत केले आहे.

3) संबंधित ग्रामपंचायतीने तिच्या कर्मचाऱ्यांना प्रथम दरमहा वेतन स्व:उत्पन्नातून अदा केल्याचे प्रतीपूर्ती प्रमाणपत्र कर्मचाऱ्याच्या पावत्या व संबंधित कर्मचारी यांचे नावासह हुद्दा व धनादेश दिनांकासह तपशिलवार संबंधित ग्रामपंचायतीकडून मागणी पंचायत समितीने घेवून त्यांना शासन हिश्याचे सहाय्यक अनुदान वितरीत करणे आवश्यक आहे. परंतु अशी माहिती विभागाने उपलब्ध न करताच अनुदान वितरीत केले आहे.

4) शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीने प्रथम 100% वेतनाची अदाई करुन नंतरच प्रदानाचे वाटप पत्रकाची नमुना नंबर 24 वेतन नोंदवहीची सत्य प्रतीद्वारे पंचायत समितीकडे मागणी करावयाची आहे. अशी वाटप पत्रके प्राप्त झाल्या नंतर वरील शासन निर्णय दिनांक 05/08/2008 नुसार तपासणी करुन नोकर पगार योग्य प्रकारे वाटप झाल्याची सत्यता गटविकास अधिकारी यांनी पडताळुन 50% शासन हिश्याच्या अनुदानाची मागणी करणे आवश्यक असुन त्या प्रमाणे प्रतिपुर्ती 100% रक्कमाची खात्री करावयाची आहे.

5) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 21 नुसार उदा केलेल्या रकमेच्या पावत्या घेणे आवश्यक आहे. परंतु नमुना नंबर 7 च्या पोच पावत्या सादर केलेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक व्हीपीएम-2009/प्र.क्रमांक125/पंरा-3, दिनांक 27 जुलै 2009 नुसार लोकसंख्या निहाय नवीन मासिक दराने सरपंच मानधन अदा करण्यात येईल. तसेच सदस्य बैठक भत्ता 1 जुलै 2009 पासुन दरमहा एका बैठकीसाठी रुपये 25/- शासनाकडुन 100% अनुज्ञेय राहिल. तरी शासन निर्णयप्रमाणे जिल्हा परिषदेकडून सरपंच मानधनाची 75% व सदस्य बैठक भत्ता असे 100% अनुदान प्राप्त झालेले आहे. लेखा परिक्षणात प्रथम अदाईची मागणी पत्र न दर्शविल्याने अदाईची खात्री पटलेली नाही.

7) शासन निर्णयानुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांचे पत्रक दिनांक 16/11/2009 व दिनांक 11/03/2010 नुसार ग्रामपंचयातीकडुन प्रतिपुर्ती प्रमाणपत्र व या पुर्वीचे वितरीत अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र घेऊन अनुदान वाटप करावे असे आदेशीत असतांना त्याप्रमाणे पंचायतीने कार्यवाही केल्याचे दिसून आलेले नाही.

**3.45 माळेगाव यात्रा खर्चातिल नियमबाहयतेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** माळेगाव यात्रा खर्चाकरिता रक्कम रूपये 28,86,675/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 210 ब नुसार प्रलंबीत अग्रीम असेल तर नवीन अग्रीम देण्यात येवु नये, अशी तरतुद आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आदेश क्रमांक 2194/2016 दिनांक 21/12/2016 नुसार रक्कम रूपये 10 लाखाचे अग्रीम मंजूर केले आहे.

2) एकता टुर्स वाहन व्यवस्था उपप्रमाणकवर दिनांक 31/12/2016 देयकात किलो मीटर दर रूपये 9/- प्रमाणे नमुद आहे. प्रादेशिक परिवाहन प्राधिकरण नांदेड बैठक दिनांक 15/03/2014 मध्ये वाहनाचे दर स्कॉर्पियो रूपये 8/- आहे. जादा प्रदान रुपये 9,000/- वसुलपात्र ठरतात.

3) प्रसाद गार्डन एसी रुम, एसी हॉल असलेल्या हॉटेलचे रबरी शिक्का मारलेले बिलावर खर्च दर्शविलेला असुन विहित नमुन्यात नसलेल्या संशयास्पद पावतीवर रुपये 5,13,770/- नियमबाह्य रोखीने प्रदान करण्यात आलेले आहे.

4) गणराज मंडप डेकोरेटर्स रुपये 58,350/- चे बिल क्रमांक 01, दिनांक 29/12/2016 असतांना धनादेश क्रमांक 627999 दिनांक 22/12/2016 आहे. मयुर कंम्प्युटर्स रूपये 35,000/- चे बिल क्रमांक 23, दिनांक 28/12/2016 असतांना धनादेश क्रमांक 628000 दिनांक 22/12/2016 आहे. सदर बाब संशयास्पद असुन बिलाआधी रक्कम प्रदान केलेली आहे. खरेदी समिती सभा दिनांक 23/12/2016 रोजी माळेगाव यात्रेत साहित्य खरेदी व सेवा पुरवठाच्या दरास मान्यता दिलेली आहे. समितीच्या मान्यतेपुर्वी धनादेश देणे नियमबाह्य आहे.

5) उपरोक्त साहित्याच्या नस्तीची पडताळणी केली असता पुरवठा आदेश देण्यात आलेल्या व इतर दोन पुरवठा व सेवा पुरविणा-याचे दरपत्रके पंचायत विभागाकडे विहित मार्गाने आल्याबाबत विभागाचा आवक क्रमांक व दिनांक सदर पुरवठादाराच्या दरपत्रक लिफ़ाफ़्यावर नमुद नाही.

6) माळेगाव यांत्रेसाठी साहीत्य खरेदी व भोजन व्यवस्था,सभा मंडप इत्यादी बाबीवर प्रस्तावीत केल्यानुसार सुमारे 29 लाख रुपये खर्च केला. त्यात विविध साहित्य खरेदी व सेवा पुरवठाबाबत वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन दरपत्रके मागविली असती, तर स्पर्धात्मक दराचा फायदा झाला असता. परंतु, केवळ 03 पुरवठादाराकडुन दरपत्रके प्राप्त करुन पुरवठा आदेश दिले. त्यामुळे आर्थीक नुकसान झाल्याची शकयता नाकारता येत नाही

7) आयकर अधिनियम 1961 कलम 194 (क) अन्वये खरेदी रकमेवर 2.3 टक्के आयकर (सरचार्जसह) पुरवठा धारकाकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करणे अनिवार्य आहे परंतु, अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.46 जिल्हा परिषद कर्मचारयांना जी.प.उपकरातून घरबांधणी अग्रिम (व्याजी कर्ज) प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद लातूरचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखा परीक्षणात जिल्हा परिषद लातूर ने मागील आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांना नवीन घर बांधने / तयार घर विकत घेणे साठी खालील विवरणा नुसार अग्रिम रुपये 75,000/- प्रति कर्मचारी अग्रीमा व्याजी कर्जे जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून देणेसाठी रक्कम रुपये 2,24,70,580/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग क्रमांक अ.सी.डी -173, दिनांक 18/04/1974 व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांचे आदेशा अन्वये घरबांधणी अग्रिम मंजूर केलेले आहे परंतु आदेशातील अटी व शर्ती नुसार मुद्दल रक्कमेची वसूली 144 हप्त्यात करण्यात यावी व व्याजाची रक्कम 48 हप्त्यात करण्यात यावी. तसेच पहिला हप्ता वाटप केल्यानंतर 12 महिन्यांनी किवा घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर यापैकी जी क्रिया लवकर होईल त्या कालावधी पासून वसुली करण्यात येईल असे असताना वसूल केलेल्या हप्त्याच्या नोंदी नोंदवहीत दिसून येत नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशातील अटी व शर्ती नुसार आदेश प्राप्त झालेपासून 15 दिवसापर्यंत गहाण खत सादर करणे बंधनकारक आहे असे असताना अदयाप पर्यंत गहाणखत सादर केले नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परिशिष्ट 1 मधील नियम 3 नुसार जिल्हा परीषदेने दिलेल्या सर्व अग्रीमाचा तपशील एपीपी 22 क्रमांकाची नोंदवही मध्ये महिना निहाय नोंदवण्यात आला पाहिजे. प्रतिमाह वसुलीची नोंदवही एपीपी 23 (व्याज मुद्दल) घ्यावयास पाहिजे आणि वसुलीचा गोषवारा काढला पाहिजे. वर्षाचा लेखा बंद करण्यापूर्वी सर्व रकमाचा ताळमेळ घेणे बंधनकारक आहे असे असताना प्रत्यक्ष वित्त विभागाकडील जमा रकमाचा आढावा न घेता शेड्युल नुसार नोंदी घेण्यात आल्या आहेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामन्य) यांनी सादर केलेल्या माहिती नुसार व प्रत्यक्ष नोंदवही नुसार सन 1988-89 ते सन 2012-2013 पर्यंत जमा रकमांचा ताळमेळ घेवुन प्रकरण निहाय अतिरिक्त वसूलपात्र रक्कम ठरणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसुली करावी व अनुपालन दर्शवावे

4) जिल्हा परिषद उपकरातून प्रदान करण्यात आलेली गृह कर्जाच्या वाटपाच्या व वसुलीच्या नोंदी सबंधित कर्मचारी यांच्या सेवा पुस्तकात घेवून तसे अनुपालन दर्शवावे

5) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी सादर केलेल्या विवारणा नुसार रक्कम रुपये 2,24,70,580/- एवढी रक्कम जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचारी यांना वाटप करण्यात आलेली होती. त्यातून रक्कम रुपये 1,32,79,137/- ची वसुली झाली. परंतु अद्याप पर्यंत रक्कम रुपये 91,91,443/- ची वसुली बाकी आहे. तरी सदर रकमेबाबत वसुलीची कार्यवाही करून रक्कम जिल्हा परिषद उपकरात जमा करून पूर्तता अनुपालन दर्शवावे

**3.47 जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना जी.प.सेस मधून वाहन अग्रिम प्रदानाच्या वसुलीतील अनियमितते बाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद लातूरचे सन 2016-17 या वित्तीय वर्षाच्या लेखा परीक्षणात असे निदर्शनास आले की, वाहन अग्रीम दिलेल्या अग्रिम वसुलीच्या बाबतीत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वितरण आदेशातील अटी नुसार वाहनाचे मॉडेलचे नाव उत्पादन वर्षे वाहन खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्रे सादर करावयाची आहेत असे असताना संबंधितांनी कागदपत्रे सादर न केल्यामुळे अग्रिम त्याच कामासाठी उपयोगात आल्याची खात्री करता आली नाही.

2) नमुना नंबर 79 ची तपासणी केली असता अग्रिम वसुलीत वेळोवेळी खंड पडल्याचे दिसून आले.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक घ.बाअ -1092 / प्र. क्र. 238 / 92, दिनांक 01/08/1990 पासून एकरूप दराने ठराव पूर्वलक्षी प्रभावाने ठेवण्याचे निर्देश आहेत तथापि जिल्हा परिषदेच्या अभिलेख्यांचे अवलोकन केले असता व्याजाची वसुली टप्याटप्याने केल्याचे दिसून येते याबाबत खुलासा करावा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परिशिष्ट 1 मधील नियम 3 नुसार जिल्हा परिषदेने दिलेल्या सर्व अग्रीमाच्या तपशील एपीपी 22 क्रमांकाची नोंदवही ब्रॉडशीट मध्ये महिना निहाय नोंदवण्यात आला पाहिजे. प्रतिमाह वसुलीची नोंदवही एपीपी 23 व्याज मध्ये मुद्दल घ्यावयास पाहिजे आणि वसुलीचा गोषवारा काढला पाहिजे. वर्षाचा लेखा बंद करण्यापूर्वी सर्व रकमाचा ताळमेळ घेणे बंधनकारक आहे परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. सोबतच्या विवरणानुसार सन 2005-2006 ते सन 2010-2011 पर्यंत वाटप केलेले वाहन अग्रिम रुपये 10,50,000/- तसेच जमा रकमांचा ताळमेळ घेवुन प्रकरण निहाय अतिरिक्त वसूलपात्र रक्कम ठरणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांनाकडून वसुली करावी व अनुपालन दर्शवावे

4) मुद्दल रक्कम व व्याज रक्कम किती याची पडताळणी अभिलेख्या अभावी करता आली नाही. सदर कर्ज वाटप बाबत वसुलीची आज रोजी पर्यंतची वसुली किती झाली याबाबतचा तपशील सबंधित विभागाने लेख्यामध्ये ठेवलेला नाही. तरी आता 2005-2006 ते सन 2010-2011 कर्मचारी निहाय दिलेले कर्ज व त्याची वसुलीतील मुद्दलाची व व्याजाची रक्कम व प्रलंबित कर्जे याचे गोषवारे काढून संबंधिताकडून सदर कर्जाची व व्याजाची रक्कम वसुलीत आणून अनुपालन सादर करावे

5) जिल्हा परिषदेच्या अभिलेख्यांचे अवलोकन केले असता मुद्दल व व्याजाच्या रक्कमांची वसुली न केल्याचे दिसून येते. तरी दिनांक 1/8/1990 नंतर दिलेल्या सर्व वाहन खरेदी अग्रीमाच्या प्रकरणांची फेर तपासणी करून त्या त्या वर्षासाठी शासनाने निर्धारित केलेल्या एकरूप दराने व्याजाची तपासणी करून प्रकरण निहाय अतिरिक्त वसुलपात्र रक्कम ठरणाऱ्या व्याजाच्या संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसुली करावी व अनुपालन दर्शवावे

**3.48 ग्रामपंचायत अपहार प्रकरणे निकाली न काढणे बाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद लातूर (पंचायत) सन 2016-2017 मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियमान्वये नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक होते. परंतु ग्रामपंचायत अपहार प्रकरणाची विहित नमुन्यातील नोंदवही दिसुन आली नाही याबाबत दक्षता घेवुन नोंदवही परिपुर्ण करुन अनुपालन दर्शवावे.

2) सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद लातूर सन 2016-2017 च्या लेखा परीक्षणाचे ग्रामपंचायत अपहार प्रकरणाच्या संचिकाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले कि ग्रामपंचायत अपहार प्रकरणे प्रलंबित असून व त्यामध्ये गुंतलेली रक्कम मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याचे दिसून आले. सामान्य प्रशासन विभागाने उपलब्ध केलेल्या माहिती नुसार ग्रामपंचायत अपहार प्रकरणे व त्या मध्ये गुंतलेल्या रकमेचा तपशील आहे

3) अपहारीत रक्कम रुपये 1,34,08,592/- च्या वसुलीबाबत कार्यवाही करून अपहार प्रकरणे निकाली काढून रक्कम वसूल करून पूर्तता दर्शवावी व अशा अपहाराच्या संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरासा-2005/प्र.क्र.262/पंरा-3, दिनांक 03/09/2005 नुसार फौजदारी गुन्हे दाखल करणे विषयी स्पष्ट केले आहे. ग्रामपंचायत अपहार निकाली काढताना आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षीत असताना अशी कार्यवाही न करता बरीच अपहार प्रकरणे नियमबाह्य निकाली काढल्याचे निदर्शनास येते.